दैनिक
राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ५ । बुधवार १४ ऑक्टोबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

यूपीआय शुल्काचा निर्णय दिवाळीनंतर

व्यापारी-ग्राहकांना दिलासा : १५ ऑक्टोबरपासूनची अंमलबजावणी पुढे ढकलली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : दिवाळीच्या सणासुदीच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदी-विक्रीला वेग येत असतानाच यूपीआय व्यवहारांवरील शुल्काच्या चर्चेने व्यापारी आणि ग्राहकांम ध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. व्यापारी यूपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) शुल्क लागू करण्यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडण्याची भीती तूर्त कमी झाली आहे. मात्र, दिवाळीनंतर कोणत्या व्यापारी व्यवहारांवर शुल्क आकारले जाणार, याची निश्चित माहिती अद्याप स्पष्ट नसल्याने संभ्रम कायम आहे.

यूपीआय व्यवहारांवरील शुल्क १५ ऑक्टोबरपासून लागू होणार असल्याची चर्चा होती. या निर्णयामुळे व्यापारी वर्गात नाराजी व्यक्त केली जात होती. आता सणासुदीचा काळ लक्षात घेऊन अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. शुल्क लागू करण्याची निश्चित तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाणार असल्याची माहिती आहे.

यूपीआयच्या माध्यमातून होणाऱ्या प्रत्येक व्यवहारावर शुल्क आकारले जाणार असल्याचा समज ग्राहकांमध्ये निर्माण झाला होता. मात्र, उपलब्ध माहितीनुसार, प्रस्तावित शुल्क सरसकट सर्व यूपीआय व्यवहारांवर लागू होणार नसून निवडक व्यापारी व्यवहारांपुरते मर्यादित राहण्याची शक्यता आहे. सामान्य ग्राहकांच्या यूपीआय पेमेंटवर थेट अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय झाल्याचे स्पष्ट झालेले नाही.

यापूर्वी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क आकारण्याबाबत चर्चा झाली होती. मात्र, हीच तरतूद अंतिम स्वरूपात लागू होणार का, तसेच कोणत्या व्यापारी श्रेणींचा त्यात समावेश असेल, याबाबत अधिकृत स्पष्टता आवश्यक आहे.

त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसाठी यूपीआय वापरणाऱ्या ग्राहकांनी घाबरण्याचे कारण नाही; मात्र व्यापाऱ्यांनी शुल्कासंदर्भातील अधिकृत नियमांची प्रतीक्षा करणे आवश्यक आहे. दिवाळीनंतर शुल्काची व्याप्ती, दर आणि अंम लबजावणीची तारीख स्पष्ट झाल्यानंतरच या निर्णयाचे बाजारपेठेवरील नेमके परिणाम समोर येतील.

■ दिवाळीच्या काळात कपडे, सोने-चांदी, इलेक्ट्रॉनिक्स, किराणा, मिठाई आणि सजावटीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी डिजिटल पेमेंटचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. अशा वेळी यूपीआय शुल्काबाबत अनिश्चितता निर्माण झाल्यास व्यापारी आणि ग्राहकांच्या व्यवहारांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. शुल्काचा भार व्यापाऱ्यांनी स्वत: सोसला किंवा वस्तूंच्या किमतीत समाविष्ट केला, तर त्याचे आर्थिक परिणाम वेगवेगळे असू शकतात.





मोहटादेवी मंदिराची 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

धार्मिक आणि आध्यात्मिक कार्याचा गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिराच्या धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद घेण्यात आली आहे. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे देवस्थान यांच्या माध्यमातून धार्मिक परंपरांचे जतन, आध्यात्मिक वारशाचे संवर्धन आणि भाविकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. आई मोहटादेवीच्या पवित्र भूमीसाठी आणि देवस्थानाच्या कार्याशी जोडलेल्या भाविकांसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे अध्यक्ष डॉ. दीपक हरके, सचिव सुप्रिया हरके, विहान हरके यांच्या हस्ते श्री मोहटादेवी देवस्थानाचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, बळूशेट लाहोटी, अशोक दहिफळे आणि ॲड. कल्याण बडे यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात मोहटा गावाजवळ वसलेले श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध श्रद्धास्थानांपैकी एक आहे. डोंगररांगांच्या सान्निध्यात वसलेल्या या मंदिरात वर्षभर भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषत: नवरात्रोत्सवात मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते. पारंपरिक धार्मिक विधी, देवीची आराधना आणि आध्यात्मिक साधनेच्या माध्यमातून या देवस्थानाने भाविकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्टच्या वतीने धार्मिक परंपरांचे जतन, विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्याचा गौरव 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'च्या 'धार्मिक वारसा आणि आध्यात्मिक सेवा' या श्रेणीअंतर्गत करण्यात आला आहे.

यावेळी देवस्थानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, कर्मचारीवर्ग आणि भाविक उपस्थित होते. श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीचा वारसा जपत श्री मोहटादेवी देवस्थानाने केलेल्या कार्याचा या सन्मानाच्या माध्यमातून गौरव झाला असून, या नोंदीमुळे मोहटादेवीच्या पवित्र क्षेत्राचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

पाथर्डीत चाकू-कुकरीचा धाक दाखवत प्लॉट विक्रीची रोकड लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

चौघे पोलिसांच्या ताब्यात!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : पाथर्डी शहरातील क्रांती चौक परिसरात प्लॉट विक्रीतून मिळालेली रक्कम घेऊन जाणाऱ्या ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर धारदार शस्त्रांनी हल्ला करून पैशांची बॅग लुटल्याच्या खळबळजनक घटनेचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. या प्रकरणात पोलिसांनी चार संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास दिपक सुधाकर येळाई (वय ६२, रा. मेन रोड, क्रांती चौक, पाथर्डी) हे प्लॉट विक्रीतून मिळालेली रक्कम घेऊन क्रांती चौक परिसरात जात होते. यावेळी दोन विनाक्रमांकाच्या मोटारसायकलींवरून आलेल्या चार अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडवले. आरोपींनी त्यांच्या हातावर लोखंडी सुरा मारून तसेच कुकरीचा धाक दाखवून त्यांच्याकडील पैशांची बॅग जबरीने हिसकावून नेल्याची फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस (पान ४ वर)

दसऱ्यानंतर राज्यात परतीच्या पावसाचा अंदाज

अहिल्यानगर : राज्यात येत्या काही दिवसांत हवामानात बदल होण्याची शक्यता आहे. हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या अंदाजानुसार, १७ ऑक्टोबरपर्यंत राज्यात कोरडे वातावरण राहून १८ ऑक्टोबरपासून बदल होऊ शकतो. २० ते २५ ऑक्टोबरदरम्यान परतीचा पाऊस पडण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. हा पाऊस सर्वदूर न पडता काही भागांत रिमझिम, तर काही ठिकाणी जोरदार स्वरूपाचा असेल, असा अंदाज आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, जालना आणि छत्रपती संभाजीनगरसह काही जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो.

दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १५ ऑक्टोबरला कोल्हापूर जिल्ह्यात हलका ते मध्यम पाऊस, तर घाट परिसरात वादळी पावसाची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किलोमीटर राहण्याचा अंदाज आहे.

ममता बॅनर्जी यांच्यावर चाकू हल्ल्याचा प्रयत्न?

दारूच्या नशेतील महिलेचे रस्त्यावर धिंगाणा; शिवीगाळ करत साडी ओढल्याचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोलकाता : पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख मम ता बॅनर्जी यांच्याशी गैरवर्तन करून त्यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. कालीघाट परिसरात दुर्गापूजा मंडपाच्या उद्घाटनासाठी जात असताना एका महिलेने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली आणि साडी ओढल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

तृणमूल काँग्रेसचे नेते कुणाल घोष यांनी दिलेल्या माहितीनुसार, ममता बॅनर्जी रस्त्यावरून जात असताना संबंधित महिला अचानक त्यांच्या समोर आली.

तिने अश्लील भाषेत शिवीगाळ करत गोंधळ घातला. महिलेच्या हातात चाकू असल्याचा आणि तिने ममता बॅनर्जी यांच्या पायावर वार करण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी होणे आवश्यक आहे.

या घटनेमागे पूर्वनियोजित कट असल्याचा संशय तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, ममता बॅनर्जी यांना झेड प्लस दर्जाची सुरक्षा असताना असा प्रकार घडल्याने सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पोलिसांकडून घटनेची चौकशी करून महिलेच्या कृतीमागील नेमके कारण स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.



राज्यसभेच्या खासदार डोला सेन यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित महिलेने आपण ममता बॅनर्जी यांची भाची असल्याचे सांगितल्याचाही तक्रारीत उल्लेख असल्याचा दावा आहे. महिला दारूच्या नशेत होती आणि तिने आक्रमक पवित्रा घेतला होता, असेही सांगण्यात आले आहे.

सेवा सेतू अभियान २५७८ ग्राहकांचा सूर्यघर योजनेला प्रतिसाद

पुणे : महावितरणच्या सेवा सेतू अभियानांतर्गत पुणे परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या २५७८ वीजजोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. तसेच ६०,८०४ वीजपुरवठा तक्रारी आणि ११,९९२ वीजबिल तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, ग्राहकांच्या नावात बदल करण्याची ४५१२ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. वीजपुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी २३४ रोहित्रेही बदलण्यात आली आहेत.

महावितरणचे कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल यांच्या म गर्दर्शनाखाली आणि पुणे परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.



सूर्यघर योजनेत २५७८ वीजजोडण्या

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत गणेशखिंड मंडलात ७१४, पुणे ग्रामीण मंडलात १११८ आणि रास्तापेठ मंडलात ७४६ वीजजोडण्या कार्यान्वित झाल्या आहेत. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत ३१६ सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले असून, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (SMART) योजनेअंतर्गत ११ वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.

४४२५ नवीन वीजजोडण्यांची प्रकरणे निकाली

अभियानांतर्गत नवीन वीजजोडण्यांची ४४२५ प्रकरणे आणि ग्राहकांच्या नावात बदल करण्याची ४५१२ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच वीजपुरवठा खंडित होण्याच्या ६०,८०४ आणि वीजबिलासंदर्भातील ११,९९२ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

२३४ रोहित्रे बदलली

वीजपुरवठ्याची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढविण्यासाठी पुणे ग्रामीण मंडलात १८१, गणेशखिंड मंडलात ४४ आणि रास्तापेठ मंडलात ९ अशी एकूण २३४ रोहित्रे बदलण्यात आली आहेत. ग्राहकांना सुलभ सेवा देणे, प्रलंबित कामे मार्गी लावणे आणि सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

तीन वर्षात ९६ हजार कोटींची देणी थकली

दहा महिन्यांत नऊ कंत्राटदारांच्या आत्महत्यांचा दावा; १९ ऑक्टोबरला राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयांवर आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील विकासकामांचा गाडा पुढे नेणाऱ्या शासकीय कंत्राटदारांची आर्थिक कोंडी आता गंभीर वळणावर पोहोचली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन यांसह विविध शासकीय विभागांकडून गेल्या तीन वर्षांपासून काम ांची देयके थकल्याने कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले आहेत. राज्यातील कंत्राटदारांची सुमारे ९६ हजार कोटी रुपयांची रक्कम प्रलंबित असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. या आर्थिक विवंचनेतून गेल्या दहा महिन्यांत नऊ कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचेही संघटनेचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर सरकारला जाब विचारण्यासाठी कंत्राटदारांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे.

येत्या १९ ऑक्टोबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करून सरकारचे लक्ष वेधण्यात येणार आहे. थकीत देयके तातडीने अदा करण्याची व्यवस्था करावी, अन्यथा राज्यभरातील कंत्राटदार रस्त्यावर उतरतील, असा इशारा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिला आहे. सरकारने मंजूर केलेली कामे पूर्ण करूनही मोबदला मिळत नसल्याने कंत्राटदारांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे.

कंत्राटदारांचा सरकारविरोधात एल्गार!

२०२२ ते २०२५ या कालावधीत शासनाने उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत चारपट कामे मंजूर केल्याचा आरोप कंत्राटदार संघटनेने केला आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक काम ांना मंजुरी आणि कार्यारंभ आदेश देण्यात आले. कंत्राटदारांनी पदरमोड करून, कर्ज काढून आणि बाजारातून उधारीवर साहित्य घेऊन ही कामे पूर्ण केली. मात्र, आता त्यांची बिले काढली जात नसल्याने आर्थिक व्यवहारांचे चक्रच थांबले आहे.

राज्य कंत्राटदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद भोसले यांच्या म्हणण्यानुसार, २०२३ पासून विविध विभागांची सुमारे ९६ हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. दुसरीकडे, एकूण थकबाकीचा आकडा जवळपास ९६ हजार कोटी रुपयांपर्यंत असल्याचा संघटनेचा दावा आहे. या थकबाकीच्या आकड्यांबाबत शासनाने अधिकृत स्पष्टीकरण देण्याची गरज आहे.

कंत्राटदारांनी कामे पूर्ण करण्यासाठी साहित्य पुरवठादारांकडून उधारीवर माल घेतला आहे. आता देयके मिळत नसल्याने पुरवठादारांकडून पैशांसाठी तगादा लावला जात आहे. दुसरीकडे, कामगार आणि कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही कठीण झाले आहे. बँकांची कर्जफेड, व्याज आणि दैनंदिन आर्थिक व्यवहार यांचा ताण वाढत आहे. परिणामी, अनेक कंत्राटदारांसमोर व्यवसाय सुरू ठेवायचा कसा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पूर्वी वर्षातून तीन ते चार वेळा देयके मिळत होती; मात्र आता बिलेच निघत नसल्याची व्यथा कंत्राटदारांनी मांडली आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रश्न सुटत नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांच्या कार्यकाळात थकबाकीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे प्रयत्न झाले; मात्र आता बैठकही होत नसल्याचे भोसले यांनी म्हटले आहे.

राज्यातील कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असताना शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी महासंघाने केली आहे. थकीत देयकांसाठी (पान ४ वर)

स्त्रीच्या आरोग्यासाठी, माहेरची साथ

उपलब्ध सुविधा स्त्रीरोग व प्रसूती सेवा
- दुर्बिणीद्वारे उपचार व गर्भाशयाच्या शस्त्रक्रिया
- वंध्यत्व चिकित्सा व उपचार
- कृत्रिम गर्भधारणा पद्धतीचे उपचार (खणख)
- प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात तपासणी
- वेदनारहित प्रसूतीची सोय
- गर्भाशय कॅन्सर चिकित्सा

आमच्या सेवा
- स्त्रीरोग चिकित्सा
- बिनटाक्याचे कुटुंबनियोजन ऑपरेशन
- कुटुंब कल्याण व गर्भपात सल्ला व मार्गदर्शन
- सोनोग्राफी
- किशोरवयीन मुलींचे समस्या व उपचार
- विवाहपूर्व सल्ला व मार्गदर्शन
- हर्निया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया

डॉ. शिवराज ब. गुंजाळ
M.B.B.S., D.G.O.
स्त्रीरोग, प्रसूती आणि वंध्यत्व निवारण तज्ञ
मो. ९८७३३२३०७३

डॉ. सोनल शि. गुंजाळ
स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ
मो. ९५२७५७७७७२

माहेर हॉस्पिटल व मॅटर्निटी होम
वेळ : स. १० ते दु.२ व सायं. ५ ते ८
२४ तास अत्यावश्यक सेवा

पत्ता : कराचीवाला नगर, तारकपूर बस स्टँडच्या मागे, अहिल्यानगर
फोन : ०२४१-२४२३७७७ । Email : Dr.shivrajggmail.com

कलथून खांब गेला.....!

भारतीय संविधानाने लोकशाही सशक्त आणि सदृढ रहावी या हेतूने काही संवैधानिक व्यवस्था निर्माण केली. निवडणूक आयोग व लोकसेवा आयोग हे अशीच संवैधानिक पदे आहेत. ह्या आयोगांना घटनेने विशेषधिकार प्रदान केले आहेत. असे करताना सदर आयोगाच्या कमकाजात राजकीय हस्तक्षेप होवू नये. तसेच नागरिकांचे मूलभूत अधिकार अबाधित रहावेत यासाठी सदरचे विशेषधिकार प्रदान केले आहेत. संविधानातील३१५ते ३२१ आणि ३२४ ते ३२७ ह्या कलमातील अंतरभूत तरतुदी अभ्यासल्या तर लोकसेवा आणि निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्य कळते.

संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे लोकार्पण करताना म्हणाले होते, ''संविधान कितीही चांगले असले तरी त्याचे चांगुलपण संविधानाचावापर करणारांवर अवलंबुन असेल!''. डॉ. बाबासाहेब किती दूरदर्शी होते, आणि त्यांनी भविष्यातील धोके किती अचूक ओळखले होते याची प्रचिती गतकाळातील आणि सध्याच्या काही घटना आणि घडामोडीतून येते .सन १९७५ मध्ये संविधानातील तत्कालीन कलम ३५२ व ३५३ चा आधार घेत तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लादली होती. त्यांनतर ५० वर्षानी निवडणूक आयोग व लोकसेवा आयोग यांच्या कार्यप्रणालीवरून उठलेले वादळ आणि सरकार घेत असलेली भूमिका यातून इतिहासाची पुनरावृत्ती होताना दिसत आहे.

निवडणूक आयोग ज्ञानेशकुमार हे वादात अडकले, त्याला तेच जबाबदार आहेत. एस. आय. आर. म्हणजे मतदारयादी पु:नर्विलोकन मोहीम(ाशिलळरश्र ळर्पींशींळसरींळेप ॲशींळीळेप). यात वावगे काहीच नाही. तसे बघितले तर हि नियमित प्रक्रिया असते. विशेष म्हणजे काँग्रेस सरकार असताना तत्कालीन कायदामंत्री कपिल सिब्बल यांनी ते विधेयक आणले होते. याचा हेतू जे देशाचे नागरिक नाहीत, घुसखोर आहेत, दुबार नावे आहेत, मृत असून मतदार यादीत आहेत ते हुडकून वगळणे हा आहे. पण, ज्ञानेश कुमार यांनी जे केले, ते समर्थनिय नाही. बिहार, पश्चिम बंगालच्या निवडणुका जाहीर झाल्यावर मतदार यादीची पडताळणी झाली. ९० लाख मतदार एकट्या पश्चिम बंगालध्ये वेगळले. निवडणूक झाल्यावर त्यांना पुरावे देवून यादी उपडेट करण्याचे आश्वासन दिले. हे सगळे शंकास्पद ठरते, नव्हे तसेच आहे.देशात तब्बल १३ कोटी इतके मतदार अपात्र ठरतात. मृत, दुबार नोंद मान्य. पण, इतरांचे काय, याचे उत्तर निवडणूक आयोगानेच देणे अपेक्षित नव्हे, तर बंधनकारक आहे.

वाद येथे उपस्थित होतो. कायद्यानुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार ज्यांचेवर आक्षेप आहे त्याला नोटीस देवून खुलासा मागणे गरजेचे आणि बंधनकारक आहे. निवडणूक आयोगाने अशा नोटीस न देताच नावे वेगळली. ह्यामुळे ''तेरा मुझसे है नाता कोई युही नहीं दिल लुभाता कोई ''असे निवडणूक आयोगाबाबत म्हणावे लागेल.देशातील तब्बल तेरा कोटी मतदार अपात्र ठरवले गेलेत. येथे निवडणूक आयोगाने संविधानात्मक जबाबदारी ची पायमल्ली केली, असेच



सिद्ध होते. मत हा नागरिकांचा घटनात्मक मूलभूत अधिकार आहे. तो अबाधित रहावा, हे बघणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. यालाच ज्ञानेशकुमारांनी तिलांजली दिली.

खरे तर निवडणूक आयोगाने याबाबत स्वतः पुढाकार घेऊन जनतेला स्पष्टीकरण देणे गरजेचे आहे. कारण, निवडणूक आयोग हा जनतेला बांधील आहे. जनतेचे मूलभूत हक्काचा रखवालदार आहे. प्रत्यक्षात निवडणूक आयोगाने मौन धारण केलेय तर भाजपचे मंत्री, प्रवक्ते हे निवडणूक आयोगाचे प्रवकत्याच्या भूमिका पार पाडीत आहेत. येथे शंकेची पाल चूकचुकने स्वाभाविक आहे.त्यामुळे नूवडणूक आयोग संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याचे दिसते. वास्तविक हा भोवरा निवडणूक आयोगाने स्वतः निर्माण केला असल्याने, त्यातून बाहेर पडणे हे त्यांच्याच हाती आहे. येथे आयोगाची गोची झाली आहे. धरले तर चावते आणि सोडले तर पळते, अशी निवडणूक आयोगाची अवस्था झालीय.

हिच अवस्था लोकसेवा आयोगाची झालीय. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पेपरफुटीचे प्रकरण थेट आंदोलनापर्यंत गेले. हे प्रकरण तसे गंभीर. पण सरकारला त्याचे गांभीर्य ध्यानात आले नाही. ज्या गांभीर्याने हे आंदोलन हाताळायचे ते सरकारला जमले नाही.यामुळे आंदोलनाने हकनाक राजकीय वळण घेतले.सरकारच्या अडमुठेपणामुळे विरीधकांना आयते हत्यार मिळाले. वास्तविक जे सुरवातीला करायचे ते शासनाने शेवटी केले. इथे फसगत झाली. यातून शासनाला आंदोलन हाताळता येत नाहीत आणि लोकशाहीतील संवदाचे महत्व उमगत नाही, हे अधोरेखित झाले. राजकीय हस्तक्षेप होण्यापूर्वीच शासनाने विद्यार्थी प्रतिनिधीशी संवाद साधला असता, तर नामुष्की टाळता आली असती.

दिल्लीत कोक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनातून राज्यकर्ते काही शिकलेत असे वाटत नाही. लोकशाहीत आंदोलने अटळ असतात. विद्यमान राज्यकर्ते विरोधात असताना आंदोलनेच करून सत्तेत आले. याचा विसर पडला, येथे चूक झाली.हि चूक आहे की घोडचूक हे आगामी काळात स्पष्ट होईल. मात्र, सरकारला आंदोलने हाताळता येत नाहीत, यावर मात्र शिक्कामोर्तब झाले, एवढे म्हणता येईल.

निवडणूक आयोग वा लोकसेवा आयोग अशा घटनात्मक पदे संशयाच्या फेऱ्यात अडकणे हे योग्य नाही आणि समर्थनिय नाही. हि पदे जनहितार्थ असल्याने त्यांची बांधिलकी जनतेशी आहे, याचा विसर पडता कामा नये. पण सध्या घटनात्मक पदावर बसणा-या व्यक्ती सरकार्धार्जीनेपणा करताना दिसत आहेत. हि लोकशाहीची शोकांतिकाच नव्हे, तर विटंबना ठरते. लोकशाहीतील घटनात्मक स्तंभच जर ठिसूळ होणार असतील तर लोकशाहीची इमारत मजबूत कशी राहील, हा खरा प्रश्न आहे.

- कलथून खांब गेला
- उध्वस्त धर्मशाळा
- तिच्या कौलारी बसून
- पारवा तो...
- खिन्न, निरस एकांत
- गीत गातो....

अशी काहीशी लोकशाहीची अवस्था झालीय!

मध्यमेश्वर प्रतिष्ठानतर्फे नवरात्र उत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा मार्केट यार्ड येथील मारुती मंदिर परिसरात श्री मध्यमेश्वर युवा प्रतिष्ठानने अध्यक्ष संदीप म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरसेवक अंकुश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली यावर्षी श्री क्षेत्र माहूरगड येथून कुलस्वामिनी रेणुकामाता मंदिरातून तब्बल चारशे किलोमीटर पायी कुलस्वामिनी ज्योतआणली.मारुती मंदिर परिसरात उभारलेल्या शामियान्यात घटस्थापना व श्री रेणुकामाता मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रतिष्ठानने नवरात्रोत्सव दरम्यान विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कुलस्वामिनी ज्योत पायी आणण्यासाठी



व घटस्थापनेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप म्हस्के, नगरसेवक अंकुश म्हस्के,प्रा.सुनील गर्जे,गोविंद चव्हाण, किरण डाके,भारत वालतुरे,प्रसाद चौधरी, बाबासाहेब दगडे,दत्ता आहेर,पप्पू मिसाळ,आकाश परदेशी,गणेश मिसाळ,गौरव जाधव,शुभम दगडे,राहुल चव्हाण,विशाल परदेशी, विशाल घोंगडे,रुपेश चरवंडे,किरण कोकाटे, बबलु झेंडे,सचिन जाधव,ऋषि पोकळे,विकास परदेशी, रोहण गरुड,आदेश आहेर,अजय चव्हाण,निखिल मोरे, सचिन पवार,वैभव आघाडे,अथर्व मोरे,कुणाल गोसावी, यश गोसाबी,अनिकेत बोरूडे,महेश भूसारी,क्रिश सोनवणे,अमोल गव्हाणे,ओम यमे,शाम झेंडे,सोमनाथ देवरे,अमोल परदेशी,ज्ञानेश्वर झेंडे,आदित्य आढाव, सोहम बोरुडे, शुभम औटी , राम गव्हाणे, युवराज कासवडे, सिद्धार्थ कुटे,सार्थक आठरे,रोहित जाधव, प्रकाश कोराळे, ओंकार गंगुले,यश बोरडे,शुभम गाढवे,अनिल गायकवाड, दिगंबर म्हस्के,गणेश जोशी,प्रमोद काळे आदींनी विशेष प्रयत्न केले.

प्रवरा अभिमत विद्यापीठ येथे गुरूवारी डॉ. अब्दुल कलाम जयंती निमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : प्रवरा इनस्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, या अभिमत विद्यापीठाच्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी च्या वतिने गुरूवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती प्राचार्य डॉ. राकेशकुमार सिन्हा यांनी दिली.

सिंधू हॉल येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर पोलिस अधिक्षक डॉ. मुम्मका सुदर्शन (आयपीएस), प्रवरा इनस्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील उपस्थित राहणार आहेत. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय क्रिडा प्राधिकरण उपसंचालक डॉ. मोनिका घुगे (सानप) यांची विशेष उपस्थिती असून विश्वस्त ध्रूव विखे पाटील, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही.एन.मगरे उपस्थिती दर्शविणार आहेत. यावेळी शेवटच्या वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव तसेच क्रिडा व सांस्कृतिक क्षेत्रात उत्तम कामगीरी केल्याबद्दल विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत.

विषारी औषध सेवनाने २० वर्षीय तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शनिशिंगणापूर : नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथील परमेश्वर आबादास शिरसाट (वय २०) या तरुणाचा विषारी औषध सेवनामुळे मृत्यू झाल्याची घटना ११ ऑक्टोबर रोजी घडली. प्रकृती गंभीर झाल्याने परमेश्वर याला प्रथम शनिशिंगणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना रात्री ७ वाजून १५ मिनिटांनी त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे गणेशवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तरुणाने विषारी औषधाचे सेवन कोणत्या कारणातून केले, याबाबत माहिती उपलब्ध नाही.

सिद्धार्थ मुथ्था यांची व्यवसाय प्रशासनमध्ये पीएचडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : नेवासा येथील सिद्धार्थ रविंद्र मुथ्था यांना नुकतीच बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (व्यवसाय प्रशासन) या विषयामध्ये पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी 'ए स्टडी ऑफ स्ट्रॅटेजीज अँड चॅलेंजेस ऑफ स्टार्टअप बिझनेसेस टू क्रिएट सक्सेसफुल बिझनेस मॉडेल्स विथ रेफरन्स टू द पुणे रीजन' या विषयावर प्रबंध सादर केला होता. डॉ. गणेश आर. पटारे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

पुणे प्रदेशातील स्टार्टअप व्यवसायांची धोरणे, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि यशस्वी व्यवसाय मॉडेल निर्माण करण्याचे मार्ग या विषयाचा सखोल अभ्यास डॉ. मुथ्था यांनी केला. ते नेवासा येथील व्यापारी रविंद्र मुथ्था यांचे चिरंजीव आहे.

एमआयडीसीतील २२० केव्ही उपकेंद्राचे काम अंतिम टप्प्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बेलापूर : श्रीरामपूर एमआयडीसी परिसरातील २२० केव्ही क्षमतेच्या वीज उपकेंद्राचे काम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे अंतिम टप्प्यात आले आहे. या उपकेंद्रामुळे श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असल्याचे तालुका संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले आणि बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी सांगितले.

नवले आणि खंडागळे यांनी उपकेंद्राच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी सांगितले की, पालकमंत्री विखे पाटील यांनी तालुक्यातील वीजसमस्येकडे गांभीर्याने लक्ष देत श्रीरामपूर वीज वितरण विभागाचे विभाजन करून बेलापूर येथे ग्रामीण उपविभागाचे कार्यालय सुरू केले. त्यामुळे शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याचे नियोजन स्वतंत्रपणे करणे शक्य झाले असून शहरावरील भार कमी होण्यास मदत झाली आहे.

एमआयडीसीतील उपकेंद्राच्या कामासाठी निधीची तरतूद करून त्याला गती देण्यात आली आहे. येत्या काही महिन्यांत हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय उक्कलगाव येथे ३३/११ केव्ही क्षमतेचे नवीन उपकेंद्र मंजूर झाले असून, त्याचेही काम सुरू होणार आहे. बेलापूर उपकेंद्रात एकफेज वीज वितरणासाठी स्वतंत्र रोहित्र बसविण्यात येत आहे. उक्कलगाव येथे ६० एकर क्षेत्रावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचेही नियोजन आहे.या कामांमुळे बेलापूर, ऐनतपूर, बेलापूर खुर्द, उक्कलगाव, एकलहरे, केसापूर, चांदेगाव, उंबरगाव, वळदगाव, पढेगाव, कन्हेगाव, लाडगाव, मातापूर, निपाणी वडगाव यांसह परिसरातील गावांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. या विकासकामांचे श्रेय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना असल्याचे सांगत, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इतरांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये, असा टोला नवले व खंडागळे



यांनी विरोधकांना लगावला. संबंधित कामांच्या उद्घाटनाचा कार्यक्रम लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नेवासा तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती

१०८ गावांसाठी टंचाईपूर्व तयारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा / सोनई : तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन १०८ गावांसाठी पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे. जलजीवन मिशनसह विविध पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष आढावा बैठक झाली. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अपूर्ण योजनांच्या कामांना गती देण्याबाबत या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले.

अपुऱ्या पावसामुळे तालुक्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, मोरेचिंचोरेसह तीन गावांमध्ये सध्या टँकरद्वरे पाणीपुरवठा सुरू आहे. आगामी काळात १०८ गावांना टंचाईचा फटका बसण्याची शक्यता



असून, त्यापैकी ९१ गावांसाठी पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने पूर्वतयारी केली जात आहे.

बैठकीत जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांचा आढावा घेण्यात आला. जलजीवन मिशनअंतर्गत २० योजनांची कामे पूर्ण झाली असून, १८ योजना पूर्णत्वाच्या टप्प्यात आहेत. यातील १६ पुनर्बांधणी योजनांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. गळनिंब पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीची लांबी २,२०० मीटरवरून ७,४०० मीटरपर्यंत वाढल्याने आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी आमदार लंघे यांनी केली.अपूर्ण योजनांमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी मांडताना, अंतिम टप्प्यातील कामे प्राधान्याने पूर्ण करून प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. यावर मंत्री गुलाबराव पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कालबद्ध नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. डिसेंबर २०२६ ते जानेवारी २०२७ या कालावधीत जास्तीत जास्त योजना पूर्ण करून कार्यान्वित करण्यावर भर देण्यात आला.टँकरऐवजी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी अपूर्ण योजना पूर्ण करणे, जलस्रोतांचा प्रभावी वापर आणि संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यावर बैठकीत भर देण्यात आला. बैठकीस नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शिर्डीत सव्वा कोटीचा बटरफ्लाय गार्डनचा डोम कोसळला; सुदैवाने जीवितहानी टळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शिर्डी नगरपरिषदेच्या श्रद्धा हाऊसिंग सोसायटी, सोपान काका नगर येथील नमो उद्यानात उभारण्यात येत असलेल्या बटरफ्लाय गार्डनचा सुमारे सव्वा कोटी रुपये खर्चाचा लोखंडी डोम कोसळल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. गोलाकार पाईपचे वेल्डिंग तुटल्याने संपूर्ण लोखंडी सांगाडा जमीनदोस्त झाला. सुदैवाने, घटनेच्या वेळी कामगार जेवणासाठी बाहेर असल्याने जीवितहानी टळली.

दुपारी दोन ते अडीचच्या सुमारास मोठ्या आवाजाने परिसर हादरला. आवाज ऐकून नागरिक घराबाहेर आले असता डोम कोसळल्याचे दिसून आले. दररोज सायंकाळी लहान मुले या परिसरात खेळण्यासाठी येतात. त्यामुळे ही घटना त्या वेळी घडली असती, तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

डोम कोसळल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत असून वेल्डिंग, लोखंडी पाईपची जाडी, आधारव्यवस्था आणि फाउंडेशनच्या मजबुतीची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी होत आहे.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांनी या नुकसानीची जबाबदारी ठेकेदाराची असल्याचे सांगितले. अद्याप ठेकेदाराला बिल अदा केलेले नसून कामाचे बिल सादर झाल्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून त्रयस्थ तांत्रिक तपासणी केली जाईल. काम दर्जानुसार नसल्यास बिल दिले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. डोम कोसळण्याचे नेमके कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी होण्याची गरज आहे.

पशुधनाच्या सर्व्हेक्षणातून चारा उत्पादनाचा अहील्यानगर पॅटर्न

मंत्री विखे पाटील यांच्या सूचनेनंतर पशुसंवर्धन विभागाचा आराखडा



चारा उत्पादनासाठी हायड्रोफोनिक्सचा उपयोग प्रशासानाने करावा ही आग्रही भूमिका पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतली आहे.टंचाई आढावा बैठकीत सर्वच ठिकाणी याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला.पशुसंवर्धन विभागाने प्रायोगिक तत्वावर याची सुरूवात करावी आवश्यक सहकार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

झरेकाठी : टंचाई परीस्थीतीच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाने तालुकानिहाय सव्हेक्षण सुरू केले असून,जिल्ह्यातील ६४ हजार पशुपालकांकडे जावून पशुधनाची माहीती संकलित केली आहे.मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नाने टंचाईच्या परीस्थीतीत चारा उत्पादनाचा ''अहील्यानगर पॅटर्न'' तयार होणार असून,चारा उत्पादनाचे नियोजन टंचाईच्या परीस्थीतीत पशुधनासाठी मोठा आधार ठरणार आहे.

जिल्ह्यात पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्येक तालुक्यात जावून टंचाई आढावा बैठका घेतल्या.यामध्ये प्रामुख्याने तालुक्यातील चारा टंचाईच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या. पशुसंवर्धन विभागाकडे असलेली पशुधनाची आकडेवारी,चारा उत्पादनाचे नियोजन आणि बियाणे वाटपात ढासळलेले नियोजन याचे गांभिर्य लक्षात घेवून विभागाला तालुका निहाय स्वतंत्र आरखडा तयार करण्याच्या सूचना प्रत्येक बैठकीत दिल्या होत्या.

प्रत्येक तालुक्यात असलेली पशुपालकांची संख्या,पशुधनाची संख्या,चारा उत्पादन करणारे शेतकरी,चारा मिळावा म्हणून मागणी करणारे शेतकरी आणि शासानाच्या योजनेनूसार मोफत बियाणे घेवून चारा उत्पादन करण्यासाठी तयार असलेल्या शेतकऱ्यांची माहीती संकलित करण्यासाठी मंत्री डॉ विखे पाटील यांच्या संकल्पनेतून एक प्रारूप तयार करण्यात आले आहे. पावसाअभावी यावर्षी चारपीक धोक्यात आली आहे.त्यामुळे टंचाईच्या परीस्थीतीत पशुधनावरच शेतकऱ्यांना अवलंबून राहावे लागणार आहे.यासाठी चारा उत्पादनावर प्रशासकीय यंत्रणेने अधिक लक्ष केंद्रीत करावे आशा सूचना पालकमंत्री ना विखे पाटील यांनी वेळोवेळी प्रशासनला दिल्या आहेत.

पशुसंवर्धन विभागातील सर्व वरिष्ठ आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संपूर्ण तालुक्यात याबबातचे सव्हेंक्षण सुरू केले आहे.अहील्यानगर जिल्हा दूध उत्पादनामध्ये सर्वात मोठा जिल्हा ओळखला जातो.पशुधनाची संख्या मोठी असून त्यादृष्टीने करण्यात येत असलेले चारा उपलब्धतेचे नियोजन टंचाईच्या सर्व परीस्थितीत दिलासा देणारे ठरणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुधनाची गणना यापुर्वी करुन टॅगिंग करण्यात आले. जनावारांच्या नोंदी अचूकपणे झाल्या आहेत.नव्या सव्हेक्षणात पुन्हा पडताळणी होत असल्याने पशुधनाची नेमकी आकडेवारी,चारा मागणी आणि पशुधनाच्या दृष्टीने भविष्यातील नियोजन गांभिर्याने होत आहे.

अखेर न्याय मिळाला; साई संस्थान कर्मचाऱ्यांचा विजयाचा जल्लोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : श्री साईबाबा संस्थानच्या ४८८ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेसंदर्भातील प्रदीर्घ लढ्याला मुंबई उच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निकालामुळे यश मिळाल्याचा दावा कर्मचाऱ्यांनी केला आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांनी पेढे वाटून आणि घोषणाबाजी करून विजयाचा जल्लोष साजरा केला.



अनेक वर्षांपासून नोकरीच्या अनिश्चिततेचा सामना करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या लढ्यात साथ देणाऱ्या न्यायव्यवस्थेचे कर्मचाऱ्यांनी आभार मानले.

विजयोत्सवाच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांनी निमगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. समता, न्याय आणि संविधानाच्या विचारांतून प्रेरणा घेत हा विजय मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो' आणि 'साई संस्थान कंत्राटी कर्मचारी एकता जिंदाबाद' अशा घोषणा देण्यात आल्या.

या आनंदोत्सवात संस्थानचे कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय आणि परिसरातील ग्रामस्थ सहभागी झाले. तथापि, कर्मचाऱ्यांच्या सेवेत कायम होण्याबाबत न्यायालयाच्या निकालातील नेमक्या अटी व आदेशांची अधिकृत पुष्टी आवश्यक आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

पिंप्रि लौकी शेतकऱ्याच्या संशोधान प्रक्षेत्रास गुजरातच्या कृषी शास्त्रज्ञांची भेट



झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील पिंप्रि लौकी आजमपूर येथील प्रगतशील शेतकरी बाळासाहेबव लावरे यांचा संशोधान प्रक्षेत्रास गुजरात राज्याची छखक्र संस्थेच्या कृषी शास्त्रज्ञांची भेट. देऊन लावले यांनी केलेल्या, सेंद्रिय व गावरान शेतीला विकसित केलेल्या तूर वांगी आणि भोपळ्याच्या शेतीला भेट देऊन माहिती जाणून घेतली. यांनी सेंद्रिय व गावरान शेतीला प्रोत्साहन देणारी विकसित केलेल्या तुर, वांगी आणि भोपळ्याच्या नवीन पिके वाणांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून व नई दिल्ली येथील कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आखेरातील संबंधित प्राधिकरणाकडे या वाणाची यशस्वी नोंदणी झाल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्थानिक वाणाचे संवर्धन व संशोधन करण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाला आहे. याप्रसंगी कृषी अधिकारी सचिन गायकवाड, सरपंच सतीश जोशी शेतकरी उपस्थित होते.

केंद्रस्तरीय स्पेलिंग पाठांतर स्पर्धेत आरोही गायकवाड प्रथम



बालाजी देडगाव : जिल्हा परिषद अहिल्यानगर शिक्षण विभाग प्राथमिक आयोजित आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत केंद्रस्तरीय स्पेलिंग बी पाठांतर स्पर्धा केंद्र येथे पार पडली. या स्पेलिंग बी पाठांतर स्पर्धेत गट क्रमांक २ (इयत्ता पाचवी व इयत्ता सहावी या गटामधून) कुटेवस्ती शाळेची इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी आरोही सुनील गायकवाड हिने प्रथम क्रमांक मिळविला व पुढील नेवासा येथे होणाऱ्या तालुकास्तरीय स्पेलिंग बी' पाठांतर स्पर्धेसाठी आरोहीची निवड झाली.

आरोहीची तयारी करून घेण्यासाठी आरोहीच्या वर्गशिक्षिका सीमा गायकवाड-खंडागळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

चिंचोली येथील प्रवरा फार्मसीत 'अविष्कार २०२६' संशोधन स्पर्धा



लोणी : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती जोपासण्यासह नावीन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ फार्मसी (डी. व बी. फार्म), चिंचोली मोह, सिन्नर येथे 'अविष्कार २०२६' ही संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत महाविद्यालयातील सुमारे १२ संशोधन प्रकल्पांची विभागीय स्तरासाठी निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (रायगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांमधील संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित करणे, नवसंकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना देणे हा स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

सोमैया विद्यामंदिर लक्ष्मीवाडीची बॅडमिंटनमध्ये दमदार कामगिरी



श्रीरामपूर : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धा वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत सोमैया विद्याविहार, मुंबई संचलित सोमैया विद्यामंदिर, लक्ष्मीवाडीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकाविले. या विजयी संघात सायली माने, श्रद्धा साबळे, समृद्धी साबळे, आदिती जमधडे आणि रोहिणी कुलकर्णी यांचा समावेश होता. तसेच १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. या संघात साईश शिंदे, वेदांत कौसे आणि तेजस जेऊघाले यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

१९ वर्षांखालील मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. या संघात सिद्धी साबळे, रिद्धी साबळे आणि श्रुती मोकळ यांचा समावेश होता. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर १४ वर्षांखालील मुलींच्या संपूर्ण विजयी संघाची तसेच १९ वर्षांखालील मुलींच्या गटातील रिद्धी साबळे यांची पुणे विभागीय शालेय बॅडमिंटन स्पर्धे साठी अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे.

भेंडा येथे 'ज्ञानेश्वर साखर कारखान्याच्या ५३ व्या गळीत हंगामा'चा शुभारंभ

१३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे ध्येय : मा.आ. नरेंद्र घुले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ५३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदीपन व ऊस गळीत हंगाम शुभारंभ कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या हस्ते व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग,अँड. देसाई देशमुख,कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.या वर्षीच्या गळीत हंगामात १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे ध्येय असल्याचे प्रतिपादन लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी केले.

यावेळी कारखान्याचे माजी संचालक काशिनाथ नवले,पद्माकर मते, शिवाजीराव कोलते, सखाराम लव्हाळे,विष्णू जगदाळे,रावसाहेब निकम, ज्ञानदेव दहातोंडे, चंद्रकांत गरड, विद्यमान संचालक डॉ.नारायण म्हस्के,पंडितराव भोसले,अशोकराव मिसाळ,दत्तात्रय काळे, जनार्धन कदम, मच्छिद्र म्हस्के,बबनराव भुसारी, अड.हिम्मतसिंह देशमुख,अमोल अभंग,विकास नन्नवरे, संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, तज्ञ संचालक रवींद्र नवले,कामगार संचालक सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे जनरल मॅनेजर रविंद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारखान्याचे संचालक प्रसाद पटारे व गौरी पटारे आणि बॉयलर अटेंडेंट संजय नवले व वैशाली नवले यांचे हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले. संचालक जनार्दन शेळके व शांताबाई शेळके यांचे हस्ते ऊस गव्हाण पूजन तर शेतकी ओव्हरशीअर शरद गव्हाणे व शिल्पा गव्हाणे यांच्या हस्ते ऊस वजन काट्याची विधिवत पूजा करण्यात आली.

कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी प्रस्ताविक केले. यावेळी बोलतांना नरेंद्र घुले पाटील म्हणाले, १३ लाख मेट्रिक टन ऊस गाळप होणारच यासाठी सर्वांनी सामूहीक प्रयत्न करण्याची गरज आहे. कोणी कुठेही वजन केले तरी आपल्या वजन काट्यावरील ऊस वजनात एक किलोचाही फरक पडणार नाही,इतकी अचूकता आहे. पश्चिम वाहिनी नद्यांचे अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविल्यास कमी खर्चात सहज रित्या ग्रॅव्हिटीने पाणी मिळेल आणि नगर, नाशिकसह मराठवाड्यातील १० जिल्ह्यांचा दुष्काळ कायम स्वरूपी हटविण्यासाठी मदत होईल.

संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग व माजी संचालक अड.देसाई देशमुख यांनी यावेळी मार्गदर्शन केले.माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय काळे,माजी पंचायत समिती सदस्य अजित मुरकुटे, घुले पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, डॉ. शिवाजी शिंदे,मोहनराव गायकवाड,गणेश गव्हाणे,नामदेव निकम, बलभीम फुलारी, किसन यादव,संदीप फुलारी,संभाजीराव माळवदे,शेषराव साबळे,बाबूलाल पटेल,दत्तात्रय माळवदे, जनार्दन कदम, भानुदास कावरे, काकासाहेब लबडे, रामदास काळे, नारायण गढेकर, दादा गजरे, बाळासाहेब वाघडकर, दादासाहेब वाबळे, बाबासाहेब आगळे, संतोष म्हस्के, हरिभाऊ नवले,अशोक मेरड, किशोर मिसाळ, अड.रवींद्र गव्हाणे, पुरुषोत्तम सर्जे, सोपान महापूर,भारत गुंजाळ, विनोद ढोकणे, सुभाष म्हस्के, शरद मिसाळ, शंकर निकम, कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर, तांत्रिक सल्लागार एम.एस. मुरकुटे,एस. डी.चौधरी, महेंद्र पवार,भगवंता शेंडगे, सुधाकर ढाकणे, वर्क्स मॅनेजर राहुल पाटील, चीफ इंजिनिअर नंदकुमार चोथे, चीफ केमिस्ट सतिष शिंदे, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के,मुख्य लेखापाल रामनाथ गरड,पर्यावरण अधिकारी राजेश वावरे,कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, लीगल ऑफिसर सुनिल शिंदे, राजेंद्र काकडे, नामदेव मुळे, विवेक जगदाळे, यांचेसह सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी,कामगार वर्ग कार्यकर्ते आदी यावेळी उपस्थित होते.भाऊसाहेब सावंत यांनी सूत्रसंचालन केले.संचालक रामनाथ राजपुरे यांनी आभार मानले.

जिल्ह्यातील ६९ लाख लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पुरवठा यंत्रणा सज्ज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



ममदापूर : राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी दिली. अहिल्यानगर जिल्ह्यात अंत्योदय, केशरी व शुभ्र अशा एकूण ११ लाख २५ हजार ८७ शिधापत्रिका आहेत. या शिधापत्रिकांशी संबंधित अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील ६९ लाख १८ हजार ८८२ लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण सुरळीत ठेवण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

जिल्ह्यातील शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२६ या दोन महिन्यांसाठी २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५१ हजार ७०९ क्विंटल अन्नधान्याची उचल पूर्ण झाली आहे. उर्वरित अन्नधान्याची उचल वेळेत पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्याचे वितरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

शासनाच्या ८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही सुरू असून, दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना आणि अन्नधान्य वितरणाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाच्या निर्धारित निकषांनुसार केली जाते. तसेच 'एक देश, एक शिधापत्रिका' योजनेमुळे स्थलांतरित पात्र लाभार्थ्यांनाही अन्य ठिकाणच्या रास्तभाव दुकानातून नियमानुसार अन्नधान्य घेता येते.

अन्नधान्य वितरणात अडचण आल्यास लाभार्थ्यांनी संबंधित रास्तभाव दुकानदार, तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग किंवा जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. वितरणात पारदर्शकता राखून पात्र कुटुंबांना वेळेत अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे.

जलतरणपटू मोहनलाल कुकरेजा यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन पदकांची कमाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : येथील ज्येष्ठ व्यापारी व जलतरणपटू मोहनलाल कुकरेजा यांनी बंगळुरू येथे झालेल्या एसीएन मास्टर्स गेम्स २०२६ जलतरण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य आणि कांस्य अशी दोन पदके पटकाविली. त्यांच्या या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या लौकिकात भर पडली आहे. या स्पर्धेत कुकरेजा यांनी २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात कांस्य, तर १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात रौप्यपदक मिळविले. या स्पर्धेत जपान, चीन, श्रीलंका, ओमान, इराण आणि थायलंडसह विविध देशांतील जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. अहिल्यानगर जिल्ह्यातून श्रीरामपूरचे कुकरेजा हे एकमेव स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेतून श्रीरामपूरला परतल्यानंतर रेल्वे स्थानकावर त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. जलतरणपटू, सायकलपटू आणि क्रीडाप्रेमींनी पुष्पहार, पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी डॉ. संकेत मुंदडा, डॉ. राम कुकरेजा, श्रीचंद कुकरेजा, राष्ट्रीय जलतरणपटू अक्षय शिंदे, विशाल कोटक, अशोकराव थोरे, रामेश्वर शेळके, प्रशिक्षक राजकुमार यादव यांच्यासह रेल्वे अधिकारी व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कुकरेजा यांच्या यशाबद्दल लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराने अभिनंदन केले. आगामी हंगेरी येथील जलतरण स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

चारा छावण्यांसाठी ऊस प्लॉट आरक्षित करा, गणेश श्रीराम यांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनावरांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांचे ऊस प्लॉट चारा छावण्यांसाठी आरक्षित करून त्यातून उपलब्ध होणारा चारा स्थानिक पशुधनासाठी वापरावा, अशी सूचना डिग्रस येथील जागरूक शेतकरी गणेश श्रीराम यांनी केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उसाचा रास्त मोबदला एफआरपीप्रमाणे देण्याची मागणीही त्यांनी केली.

दुष्काळात पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता हा महत्त्वाचा प्रश्न बनतो. चारा छावण्या सुरू करताना तेथे दाखल होणाऱ्या जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होईल, याचे नियोजन प्रशासनाने करणे आवश्यक आहे. संगमनेर तालुक्यातील उपलब्ध ऊस क्षेत्राचा चारा स्रोत म्हणून उपयोग केल्यास स्थानिक पशुधनाला दिलासा मिळू शकतो, असे श्रीराम यांनी सांगितले. धरणे आणि तलावांतील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्याच्या धर्तीवर दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याचेही नियोजन करावे. तालुक्यातील चारा बाहेरगावी जाण्याऐवजी स्थानिक जनावरांना उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या सहकार्याने ऊस चारा छावण्यांसाठी उपलब्ध करून घेता येईल. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे योग्य मोबदला देण्याची व्यवस्था शासनाने करावी. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासोबतच चारा छावण्यांसाठी चाऱ्याची उपलब्धताही वाढू शकते, असे त्यांनी नमूद केले. दुष्काळात पशुधन वाचविणे आणि पशुपालकांचे नुकसान कमी करणे यासाठी प्रशासनाने या प्रस्तावाचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन गणेश श्रीराम यांनी केले आहे.

घरफोडी करणाऱ्या आरोपींना वाड्या-वस्त्यांवर नेऊन केला पंचनामा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : शहरालगतच्या उस्थळ रस्त्यावरील वाड्या-वस्त्यांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या घरफोडीच्या गुन्ह्याचा नेवासा पोलिसांनी छडा लावला असून दोन सराईत आरोपींना जेरबंद केले आहे. शेतकऱ्यांमधील भीती घालवण्यासाठी पोलिसांनी आरोपींना थेट घटनास्थळी नेऊन तेथील घटनेचा पंचनामा केल्याने परिसरात चर्चेचा विषय बनला आहे. तर पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सिंघम भूमिकेत ही कारवाई केल्याने सर्वसामान्य नागरिक समाधान व्यक्त करतांना दिसत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष शंकर काळे (रा. नाशिक) याला नाशिक येथून, तर विकी उर्फ विकास ज्ञानेश्वर पवार (रा. श्रीरामपूर) याला छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

३ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजता फिर्यादी विजय कदम यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश केला होता. घरातील सदस्यांचे हात-पाय बांधून लाकडी दांडके व लोखंडी गजाने मारहाण करत सुमारे १ लाख २७ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटून नेली होती. याच रात्री शेजारील दोन-तीन वस्त्यांवरही चोरीचा प्रयत्न झाल्याने उस्तळ परिसरातील शेतकरी धास्तावले होते.

या घटनेनंतर पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, अंमलदार सुमित करंजकर, नारायण डमाळे, अतुल शेळके, किरण पवार, परमेश्वर गहाळ, सुनील गंगावणे, गणेश जाधव यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या आधारे दोन्ही आरोपींना सापळा रचून अटक केली.

पंचनाम्याच्या निमित्ताने दहशत मोडीत सोमवारी सायंकाळी ६ वाजता पोलिसांनी दोन्ही आरोपींना बेड्या ठोकून घटनास्थळी आणले. ज्या घरात चोरी झाली, त्या ठिकाणी पंचनामा करण्यात आला. याच वेळी चोरट्यांचा धाक मोडून काढण्यासाठी वाड्या-वस्त्यांवरून त्यांना पाई फिरवल्याने हा प्रकार पाहण्यासाठी शेतकरी, महिला व तरुणांनी मोठी गर्दी केली होती.

दवाखाना सुरू करण्यासाठी २० लाखांची मागणी; विवाहित डॉक्टर महिलेचा छळ

पती, सासू आणि दीराविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : पतीचा दंतवैद्यकीय दवाखाना सुरू करण्यासाठी माहेरून २० लाख रुपये तसेच लग्नातील छायाचित्रकाराचे दीड लाख रुपये आणावेत, या मागणीवरून विवाहित डॉक्टर महिलेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पती, सासू आणि दीर अशा तिघांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अर्पिता नितीन शर्मा (वय २८, सध्या रा. वांबोरी, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचा विवाह ५ मार्च २०२५ रोजी राजस्थानमधील जोधपूर येथे नितीन दिपचंद शर्मा यांच्याशी हिंदू रीतिरिवाजानुसार झाला होता. विवाहानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगले गेल्यानंतर सासू सुमनलता शर्मा आणि दीर रितीक शर्मा यांनी घरगुती कारणांवरून त्रास देण्यास सुरुवात केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

लग्नात मागणीनुसार पैसे दिले नसल्याचे सांगून छायाचित्रकाराचे दीड लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात आली. तसेच पतीला दंतवैद्यकीय दवाखाना सुरू करण्यासाठी माहेरून २० लाख रुपये आणण्याचा तगादा लावण्यात आला. माहेरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे सांगितल्यानंतर शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. पतीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. माहेरी फोन करण्यास व मोबाईल वापरण्यास मनाई करणे, जेवण न देणे आणि माहेरी तक्रार केल्यास बदनामी करण्याची धमकी देणे, असे प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. जून २०२५ मध्ये मारहाण करून चाकूचा धाक दाखविल्यानंतर त्या भावासोबत माहेरी गेल्या. त्यानंतरही फोनवरून शिवीगाळ व धमक्या दिल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी नितीन दिपचंद शर्मा, सुमनलता दिपचंद शर्मा आणि रितीक दिपचंद शर्मा (सर्व रा. बिसलपूर, जोधपूर, राजस्थान) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ८५, ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त महिलांनी काढली भवानी ज्योत यात्रा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : शारदीय नवरात्रोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त नेवासा शहरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शहरातील सर्व महिला एकत्र येत भक्तिभावाने आई जगदंबेच्या नावाने ज्योत यात्रा काढली. देवीचा नामघोष करत महिलांनी नेवासा शहरातील विविध देवींच्या मंदिरांना भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि स्त्री शक्तीच्या जागराचा उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या निमित्ताने महिलांनी एकत्र येत धार्मिक परंपरेचे जतन करण्याबरोबरच एकतेचा आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला. श्रद्धा, भक्ती आणि उत्साह यांचा सुंदर संगम असलेल्या या ज्योत यात्रेमुळे नेवासा शहरातील नवरात्रोत्सवाच्या आनंदात भर पडली. यावेळी महिलांच्या वतीने काढण्यात आलेल्या ज्योत यात्रेचे येथील दुर्गादेवी मंदिरात आगमन झाले असता मंदिराच्या वतीने शिलाताई चव्हाण, मीनाताई पठाई, संगीता चव्हाण, सीमा कदम, रुपाली चव्हाण यांनी पंचारती ओवाळून सर्व महिलांना भगव्या पटट्या देऊन स्वागत केले तर शुभांगी नंदकुमार पाटील व नगरसेविका जयश्रीताई शिंदे यांच्या हस्ते ज्योतीचे पूजन करण्यात आले.

पान १ वरुन

पाथर्डीत चाकू-कुकरीचा धाक दाखवत प्लॉट विक्रीची रोकड लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्ह्याचा समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. संतोष मुटकुळे यांनी पो. उपनिरीक्षक विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार केले. या पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

१२ ऑटोबर रोजी तपास पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, या गुन्ह्यात सहभागी असल्याचा संशय असलेला मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद हा माणिकदौंडी रोडवरील एम. एम. निहाळी हायस्कूलजवळ असल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी जाऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी सुरज संतोष वडागळे (रा. बेल्हेकरवाडी रोड, सोनई), आकाश शरद हराळे (रा. सोनई, ता. नेवासा) आणि इसाक पापा शेख (रा. दुलेचांदगाव, ता. पाथर्डी) यांनाही ताब्यात घेतले.

१ लाख ७० हजारांची रोकड आणि मोबाईल जप्त

तपासादरम्यान मुदस्सर उर्फ मुज्जु याने लुटलेल्या रकमेपैकी दोन लाख रुपये आपल्या वाट्याला आल्याचे सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यापैकी ३० हजार रुपये खर्च केले असून उर्वरित रक्कम घरी ठेवल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार पंचांसमक्ष पोलिसांनी १ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम, एक पिशवी आणि अंदाजे १० हजार रुपये किमतीचा एक मोबाईल असा एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या गुन्ह्यात साहिल खान (रा. तिसगाव), राजू ठाकूर (रा. दिल्ली), विशाल ब्राम्हणे (रा. शनिशिंगणापूर), सोमनाथ रमेश काळोखे (रा. पाथर्डी) यांच्यासह अन्य व्यक्तींचा सहभाग असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. काही संशयित फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. ताब्यातील आरोपींना पुढील तपासासाठी पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

पोलीस पथकाची महत्त्वपूर्ण कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव तसेच पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, अतुल लोटके, रणजीत जाधव, बाळासाहेब खेडकर, योगेश कर्डीले, किशोर शिरसाठ आणि प्रशांत राठोड यांच्या पथकाने केली.

.....

तीन वर्षात ९६ हजार कोटींची देणी थकली

निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, निधी उपलब्ध करून द्यावा आणि नियमित बिलांसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी, अशी कंत्राटदारांची अपेक्षा आहे. १९ ऑटोबरच्या आंदोलनातून राज्यभरातील कंत्राटदार एकजूट दाखवणार असून, सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विकासकामे करूनही मोबदल्यासाठी संघर्ष करण्याची वेळ कंत्राटदारांवर आली असेल, तर राज्यातील विकासकामांच्या आर्थिक नियोजनावरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. आता सरकार या गंभीर प्रश्नावर काय भूमिका घेते आणि थकीत देयकांसाठी कोणता ठोस निर्णय घेते, याकडे राज्यातील कंत्राटदारांचे लक्ष लागले आहे.

पुरीभाजी देण्यास नकार दिल्याने हॉटेल मालकाला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी, : पुरीभाजी देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून हॉटेल मालकासह त्याच्या मित्राला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी शहरातील नवीपेठ परिसरात ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. यावेळी आरोपींनी गलोलीने खडे मारून दोघांना जखमी केले, तसेच हॉटेलमधील सामानाची तोडफोड करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

अक्षय राजेंद्र गुलदगड (वय २४, रा. तनपुरेवाडी, राहुरी) यांचे नवीपेठ येथे सावता हॉटेल आहे. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास आरोपी हॉटेलमध्ये आले आणि त्यांनी पुरीभाजी देण्याची मागणी केली. यापूर्वी पैसे न देता जेवण केल्याने आता आधी पैसे द्या, असे अक्षय यांनी सांगितले. याचा राग आल्याने आरोपींनी शिवीगाळ करून तेथून निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

त्यानंतर अक्षय यांनी मित्र ऋतिक किशोर डागवाले याला बोलावून घेतले. काही वेळाने आरोपी पुन्हा हॉटेलमध्ये आले. त्यांनी अक्षय आणि ऋतिक यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच गलोलीने खडे मारून जखमी केले. हॉटेलमधील सामानाची नासधूस करून ते अस्ताव्यस्त फेकले. पुन्हा जेवण दिले नाही, तर जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

अक्षय गुलदगड यांच्या फिर्यादीवरून आकाश रावसाहेब माळी, किरण दत्तू बर्डे (दोघे रा. एकलव्य वसाहत, राहुरी) आणि प्रभुदेव गुंजाळ (रा. मुलनमाथा, राहुरी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते करीत आहेत.

अकार्डियन आणि हार्मोनियमच्या सुरांनी श्रीरामपुरातील रसिक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : अकार्डियन आणि हार्मोनियमच्या सुरेल साथीने जुन्या हिंदी चित्रपटगीतांची अविस्मरणीय संगीत मेजवानी श्रीरामपूरकरांना अनुभवायला मिळाली. रसिक ग्रुपच्या कलाकारांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित श्रोत्यांना जुन्या गाण्यांच्या आठवणींत रमवले. सुमारे दोन तास रंगलेल्या या कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध झाले.

शहरातील गुजराथी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. अकार्डियनचे उत्कृष्ट वादक शिरीष कीर्तने आणि हार्मोनियमवादक शशांक शिरपाळकर यांनी आपल्या वादनातून जुन्या गीतांना सुरेल उजाळा दिला. डॉ. विक्रम आगाशे, आगाशे परिवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रंगमंचाची पूजा करण्यात आली. डॉ. विक्रम आगाशे यांनी शिरीष कीर्तने यांच्याशी संवाद साधत अकार्डियन या वाद्याची माहिती श्रोत्यांना दिली. कीर्तने यांनीही रसिकांशी दिलखुलास संवाद साधला.

'मधुमती', 'अमरप्रेम', 'कटी पतंग', 'अनाडी', 'तीन देवियाँ', 'आनंद' आणि 'संगम'



यांसारख्या चित्रपटांतील गीतांचे वाद्यसंगीत सादर करण्यात आले. यशवंत कुलकर्णी, साधनाताई गिरमे, अनिल मुखेडकर आणि नितीन चौधरी यांनीही गायनातून रसिकांची दाद मिळवली. कार्यक्रमादरम्यान दोनदा वीजपुरवठा खंडित होऊनही श्रोते शांतपणे पुढील सादरीकरणाची वाट पाहत होते. सूत्रसंचालन आगाशे यांनी केले. आयोजकांनी सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानले.


राहुरीत वनविभागाच्या पथकाने रेस्क्यू ऑपरेशन विहित पडलेला बिबट्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी तालुक्यातील मालुंजे खुर्द येथे शेतकऱ्याच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याची घटना समोर आली आहे.या घटने संदर्भात माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत बिबट्याला सुरक्षितपणे विहिरीतून बाहेर काढून ताब्यात घेतले. त्यानंतर या बिबट्याला बारागाव नांदूर येथील रोपवाटिकेत ठेवण्यात आले आहे. वनविभागाने तत्परतेने केलेल्या या कारवाईमुळे बिबट्याला सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मालुंजे खुर्द येथील शेतकरी शिवाजी भागवत सोळंके यांच्या मालकीची गट क्रमांक २५/२ मध्ये शेती आहे. या शेतातील विहिरीत बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. ही बाब समजल्यानंतर संबंधित पोलीस पाटील यांनी तत्काळ वनक्षेत्रपाल ज्ञानेश्वर साळुंखे यांना दूरध्वनीवरून माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनक्षेत्रपाल ज्ञानेश्वर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली



राहुरी वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपाल बाळासाहेब आटोळे, वनरक्षक संदीप कोरके, निलेश जाधव, वनकर्मचारी शशिकांत मोरे आणि वाहनचालक ताराचंद गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीत पडलेल्या बिबट्याला सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी वनविभागाच्या पथकाने रेस्क्यू मोहीम राबवली.वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्नपूर्वक बिबट्याला विहिरीतून बाहेर काढून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला बारागाव नांदूर येथील रोपवाटिकेत सुरक्षित ठेवण्यात आले आहे.दरम्यान, ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर वाढत असल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शेतात काम करताना तसेच विहिरीच्या परिसरात जाताना नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात येत आहे.

दुष्काळग्रस्त गावात पिण्याचे पाणी व चारा नियोजनावर भर द्यावा : संतोष जाधव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यातील शिल्लेगाव जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व गावाचा आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा परिषद सदस्या , सविता संतोष जाधव आणि शेतकरी नेते , तथा माजी सभापती संतोष पाटील जाधव यांनी घेतला दुष्काळी परिस्थिती चा आढावा घेऊन जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन यावेळी संतोष पाटील जाधव म्हणाले कि , संपूर्ण राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी साठी छावण्या उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे . तसेच केंद्रीय पथकाने देखील दुष्काळग्रस्त भागांची पाहणी केली आहे, तसा आपला अहवाल लवकरच केंद्र सरकारला सादर केल्यानंतर लगेच तात्काळ नुकसान भरपाईच्या मदतीचा मार्ग मोकळा होणार आहे.

केंद्रीय अधिकाऱ्यांच्या तीन पथकांनी अहिल्यानगर, सोलापूर, जालना, बीड, धाराशिव, वाशिम, यवतमाळ आदी जिल्ह्यांतील विविध दुष्काळग्रस्त गावांतील शेती, पाण्याचे स्रोत यांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच परिस्थितीची माहिती घेत शेतकऱ्यांशी संवाद साधला. केंद्रीय पथकाच्या या विस्तृत दौर्यामुळे नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या जात आहे. या पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांची वस्तुस्थिती केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल. जिल्हा परिषद सदस्य सविता जाधव म्हणाल्या की, मान्सूनच्या पहिल्या दीड महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने यंदा बऱ्यापैकी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. पण्याच्या पाण्याला सर्वाधिक प्राधान्य द्यावे लागणार आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे सर्व स्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरडरे पाणी पुरवठ्यात योग्य नियोजन व वापर करून प्रत्येक गावापर्यंत वाडी - वस्ती पर्यंत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा तयार करावा अशीही मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

शेतात पोल रोवल्याच्या कारणावरून पती-पत्नीला शिवीगाळ करून मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : माझे शेतात पोल का रोवतात, असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ, दमदाटी करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील येवले आखाडा येथे घडली.

सारंगधर सखाराम सांगळे, वय ५७ वर्षे, रा. येवले आखाडा, ता. राहुरी, यांची येवले आखाडा येथे शेती असुन त्या शेतीच्या वादाचा दावा न्यायालयात दाखल आहे. दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास सारंगधर सांगळे घरी असताना आरोपी तेथे आले आणि उभ्या ऊसाच्या शेतात खड्डे घेवुन लोंखडी पोल रोवण्याचे काम चालु केले. तेव्हा सारंगधर सांगळे त्यांना म्हणाले माझे शेतात पोल का रोवतात. तेव्हा आरोपींनी सारंगधर सांगळे व त्यांची पत्नी सुनिता सारंगधर सांगळे अशा दोघांना शिवीगाळ, दमदाटी करुन लाथा बुक्क्यांनी मारहान केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. नंतर शेतातील ऊस तोडुन नुकसान केले, तोडलेला ऊस घेवून गेले. आरोपींचा सारंगधर सांगळे यांच्या शेतात कोणताही कायदेशीर अधिकार नसताना अतिक्रमण करुन ताबा मिळवला.

CHANGE IN NAME

My previous Name Was Khavde Govind Raosaheb Now I Have Changed My Name To Khavde Govind Ravsaheb R/o- S-3/3,Sakhar Karkhana Kamgar,Vasahat, Shrishivajinagar,Tal-Rahuri, Dist- Ahmadnagar Pin code-413706 Date 14/10/2026

शिवाजीनगरमध्ये दोन नळजोडण्यांवर मुकिंदपूर ग्रामपंचायतीची कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा फाटा : नेवासा फाटा येथील शिवाजीनगर परिसरात पाणीपुरवठ्याच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले असून, नियमबाह्य नळजोडण्या आणि नळांना थेट मोटारी लावून पाणी उपसण्याच्या प्रकारांमुळे नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर मुकिंदपूर ग्रामपंचायतीने परिसरातील दोन नळजोडण्यांवर कारवाई केली आहे.

शिवाजीनगर परिसरात काही नागरिकांकडून पाण्याच्या नळाला मोटारी जोडून पाणी उपसले जात असल्याने इतर घरांमधील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच काही घरांमध्ये दोन-दोन नळजोडण्या असल्याची बाबही समोर आली आहे. त्यामुळे नियमित पाणीपुरवठ्यासाठी ग्रामपंचायतीने या प्रकारांची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून, काहींच्या नियमबाह्य कृतींमुळे इतर कुटुंबांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नळजोडण्यांची तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

नवरात्र उत्सवानिमित्त भगवती मंदिराच्या प्रांगणात सामूहिक सप्तशती पाठ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोल्हार : कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्ट व श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र तसेच कोल्हार भगवतीपुर ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने व परमपूज्य गुरुमाऊलीच्या कृपाशीर्वादाने शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त कोल्हार येथील ग्रामदैवत भगवती माता मंदिराच्या प्रांगणात सामुदायिक पर्जन्य सुक्ता सहित श्री दुर्गा सप्तशती पाठाचे वाचन करण्यात आले आज सोमवारी पहिल्या दिवशी यात ४४५ महिलांनी भाविकांनी सहभाग घेतला. नवरात्र उत्सव काळात रोज सकाळी या सप्तशती पाठाचे वाचन होणार असून यात जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन विजय डेंगळे यांनी केले आहे.



कोल्हार -लोणी रस्त्याचे अत्यंत निकृष्ट

रस्ता रुंदी करण्याच्या कामासाठी शेकडो झाडांची कत्तल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोल्हार : गेली वर्ष दीड वर्षापासून सुरू असलेल्या कोल्हार लोणी रस्त्याचे रुंदीकरणाचे काम अतिशय संथ गतीने चालू असून या रस्त्याच्या कामासाठी सर्रास मुरूम व मातीचा वापर करीत असल्यामुळे रस्त्याच्या कामाच्या दर्जाबद्दल नागरिकांनी शंका उपस्थित केले आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खोदून ठेवलेल्या साईड पट्ट्यामुळे दोन ते तीन फुटाच्या कपारी या रस्त्यावर तयार झाल्या आहेत. कोल्हार -लोणी दरम्यान असलेल्या अरुंद पुलाच्या रुंदीकरणाचे काम यामुळे या रस्त्यावर अनेक ठिकाणी ड्रायव्हर्षण करण्यात आले आहे ड्रायवर्षण करताना करताना ठेकेदाराने सुरक्षितता म्हणून कोणतेही काळजी न घेतल्याने या रस्त्यावर अलीकडच्या काळात अनेक अपघात होऊन या अपघातात अनेक निष्पाप बळी गेले आहेत तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी वापरत असलेल्या मुरूम व मातीमुळे या रस्त्यावर धुळीचे प्रचंड साम्राज्य असून छोट्या मोठ्या वाहन चालकांना या रस्त्यावरून जाणे अतिशय त्रासदायक होत आहे गेली एक वर्षापासून या धुळीच्या साम्राज्यात लोक वावरत असल्यामुळे अनेकांना डोळ्यांचे विविध विकार ,ॲलर्जी, सर्दी, तसेच फुफुसाचे विकार अशा विकारांना सामोरे जावे लागत आहे. रात्रीच्या वेळी कोल्हार लोणी रस्त्यावरून वाहने चालवणे अतिशय धोकादायक बनले आहे समोरून येणाऱ्या वाहनाचा प्रखर लाईट आल्यास वाहनधारकांना वाहन चालवणे मुश्किल होते. रस्ता रुंदीकरणासाठी कोल्हार लोणी रस्त्यावरील शेकडो झाडांची कत्तल करण्यात आल्यामुळे कोल्हार लोणी रस्त्यावरील झाडांची सावली नाहीशी झाली आहे रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली या शेकडो झाडांची कत्तल करण्याची काहीच गरज नव्हती असेही नागरिकां मध्ये चर्चा सुरू आहे.

या संथगतीने चालणाऱ्या रस्ता रुंदीकरणाच्या कामाला वेग कधी घेणार व वाहनचालकांच्या व रस्त्याच्या कडेला राहणाऱ्या रहिवाशांना होणाऱ्या यातना कधी संपणार असाही सवाल वाहन चालक व नागरिक करीत आहेत. काम उत्कृष्ट व्हावे एवढीच अपेक्षाही वाहनचालक व नागरिक करीत आहेत.

CHANGE OF NAME

My Old Name is PATIL PRAKASH TRAMBAK. My New Name is PATIL PRAKASH TRIMBAK, Address : Ward No 7, laxmi Nagar, Dalavi wasti, Sarswati Colony, Shrirampur, Dist. Ahilyanagar.

निधनवार्ता

सुनंदा जोशी



श्रीरामपूर : ऐनतपूर नवले-बंगाळवस्ती येथील ज्येष्ठ महिला सुनंदा दिलीप जोशी-कडेकर (वय ७१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. बेलापूर येथील श्री मेडिकलचे दिलीप उर्फ प्रकाश चंद्रचूड जोशी (कडेकर) यांच्या त्या पत्नी, देवेन जोशी (कडेकर) यांच्या मातोश्री ज्येष्ठ डॉ. शशिकांत जोशी (कडेकर) यांच्या भावजयी तर डॉ. आशुतोष व सचिन जोशी (कडेकर) यांच्या चुलती होत.

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
01/06/2026 to 05/06/2026	4 4 0 — 89 — 1 3 5	9 9 0 — 80 — 1 2 7	2 6 0 — 82 — 5 7 0	1 2 8 — 11 — 2 9 0	5 9 0 — 48 — 1 3 4
08/06/2026 to 12/06/2026	4 5 6 — 56 — 1 2 3	5 5 6 — 67 — 1 8 8	4 5 8 — 76 — 4 6 6	2 4 0 — 69 — 3 7 9	6 8 9 — 33 — 1 3 9
15/06/2026 to 19/06/2026	1 1 9 — 15 — 2 4 9	3 4 8 — 50 — 1 3 6	1 5 8 — 42 — 3 9 0	2 5 7 — 41 — 2 4 5	1 2 6 — 90 — 6 7 7
22/06/2026 to 26/06/2026	3 3 6 — 21 — 2 4 5	1 1 8 — 04 — 1 5 8	6 8 9 — 33 — 7 7 9	1 6 8 — 55 — 2 4 9	5 7 9 — 19 — 2 8 9
29/06/2026 to 03/07/2026	1 4 4 — 95 — 2 4 9	1 2 7 — 04 — 7 8 9	2 5 7 — 47 — 2 6 9	1 5 7 — 34 — 2 6 6	2 5 5 — 22 — 6 7 9
06/07/2026 to 10/07/2026	5 5 8 — 84 — 3 5 6	1 2 0 — 36 — 7 9 0	2 3 7 — 21 — 4 7 0	1 5 0 — 60 — 1 3 6	2 7 7 — 69 — 1 4 4
13/07/2026 to 17/07/2026	1 3 0 — 41 — 1 5 5	6 8 0 — 47 — 3 6 8	1 2 8 — 18 — 3 5 0	3 7 9 — 90 — 1 5 0	1 3 6 — 63 — 3 0 0
20/07/2026 to 24/07/2026	3 6 0 — 96 — 1 1 4	2 7 7 — 64 — 7 7 0	2 5 9 — 60 — 1 4 5	1 8 9 — 81 — 5 7 9	1 7 9 — 78 — 1 7 0
27/07/2026 to 31/07/2026	2 5 9 — 60 — 5 5 0	5 9 0 — 42 — 2 2 8	3 5 8 — 62 — 3 9 0	4 0 0 — 47 — 8 9 0	1 6 0 — 70 — 4 8 8
03/08/2026 to 07/08/2026	2 3 4 — 90 — 5 6 9	1 7 0 — 85 — 1 5 9	3 3 8 — 42 — 1 2 9	4 6 0 — 09 — 4 7 8	3 7 0 — 05 — 3 4 8
10/08/2026 to 14/08/2026	5 7 7 — 99 — 2 3 4	2 3 0 — 53 — 1 4 8	2 5 0 — 70 — 2 3 5	3 5 5 — 39 — 1 3 5	1 3 3 — 76 — 3 5 8
17/08/2026 to 21/08/2026	2 4 0 — 60 — 4 6 0	2 7 8 — 73 — 3 4 6	1 1 6 — 82 — 4 8 0	1 5 6 — 23 — 7 7 9	4 4 9 — 77 — 1 7 9
24/08/2026 to 28/08/2026	3 6 0 — 96 — 7 9 0	2 5 5 — 23 — 2 8 9	7 8 9 — 42 — 2 3 7	4 5 0 — 98 — 4 4 0	2 6 6 — 41 — 2 9 0
31/08/2026 to 04/09/2026	1 4 9 — 43 — 6 7 0	1 7 0 — 81 — 5 6 0	1 5 9 — 52 — 3 3 6	6 9 0 — 50 — 2 3 5	5 7 7 — 99 — 1 3 5
07/09/2026 to 11/09/2026	6 8 0 — 47 — 5 5 7	2 2 8 — 27 — 1 2 4	5 7 0 — 26 — 3 5 8	1 1 2 — 43 — 7 7 9	4 4 5 — 33 — 6 8 9
14/09/2026 to 18/09/2026	7 8 9 — 47 — 1 2 4	3 3 6 — 20 — 1 3 6	7 9 9 — 56 — 1 7 8	6 8 0 — 42 — 3 4 5	3 9 9 — 16 — 7 9 0

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

मंगळवार दि. १२ ऑक्टोबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१२० / ४९० / ६७० — ५ — २३० / २५८ / १२२ — ० — १९० / २८० / २४४

१३-३९-४५-५७-९०-०८

कल्याण
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१४६ / ४७० / ३४४ — ७ — १२४ / ४६७ / १३३ — ८ — १७० / १८९ / ११६

०१-१९-२७-७४-५८-८६

मुंबैम (मेन)
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

२४० / २६८ / ६०० — ४ — १३० / १४९ / ११२ — ७ — १२४ / १७९ / ११५

५४-६९-०४-४१-३७-७८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

भाजपचे अशोक ताके यांनी राज्यपाल बागडे यांची जयपूर येथे घेतली भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : येथील भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते अशोकराव दिनकरराव ताके यांनी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची जयपूर, राजस्थान येथील शासकीय राजभवनात सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

भेटीदरम्यान नेवासा परिसरातील विविध विषय, स्थानिक प्रश्न तसेच इतर महत्त्वाच्या बाबींवर विचारविनिमय करण्यात आला. अशोकराव ताके हे भाजपचे राज्यस्तरीय नेते जेष्ठ नेते दिनकरराव ताके यांचे चिरंजीव असून दिनकरराव ताके यांनी भाजपच्या वाढीसाठी एकेकाळी भरीव असे कार्य जेष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांच्या समवेत केले आहे.

अशोकराव ताके यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून यशस्वीपणे रस्त्यावर उतरून न्यायालयात विद्यार्थी वर्गासाठी लढे उभारले होते तसेच भारतीय जनता युवा मोर्चा, सहकार भारती व भारतीय जनता पार्टीमध्ये ही मोठ्या प्रमाणात कार्य केले असल्याचे त्यांनी सांगितले.राज्यपाल बागडे यांनी जेष्ठ नेते दिनकरराव ताके पाटील यांच्यासह जिल्हयातील जुन्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कार्याला यावेळी बोलतांना उजाळा दिला.



जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १३/१०/२०२६.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

स. नं.-१०/१/५, हे. आर-०१. १५.०३, रु. पै.-०.१७

यापैकी विद्यमान मालक यांचे मालकी वाहिवाटीचे ० हे. २८.७५ आर क्षेत्राची मिळकत. यांसी चतुः सिमा

पुर्वेस : स.नं.१० पैकी १/२ व १/३, दक्षिणेसः अंतर्गत रस्ता व स.नं. पैकी, पश्चिमेसः स. नं. १० पैकी १/४ व १/५ पैकी, उत्तरेसः लागु स. नं. ३२२

येणे प्रमाणे चतुः सिमापूर्वक वर्णनाची शेत जमीन तदंगभुत वागणुकीचे वहिवाटीचे हक्कासह काहीएक राखुन न ठेवता असे.

वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक-

१. श्री. रामदास किसन औताडे, रा. केडगाव, अहिल्यानगर.

२. प्रकाश मथुजी आंधळे, रा. डॉक्टर कॉलनी, बुरूडगाव रोड अहिल्यानगर.

ॲड. गणेश अशोक शेटे
पत्ता : जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर.
मो. नं. ९५२७०२९२२७

कापरेवाडीच्या सरपंचांसह गावगुंडाना अटक करा

ग्रामस्थांचा पोलीस ठाण्यावर निषेध मोर्चा

। राष्ट्र सह्याद्री



कर्जत : मागील आठवड्यात कापरेवाडी (ता.कर्जत) येथे दादा शिंदे आणि अजित वांगडे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. सदरच्या घटनेतील आरोपी अजून मोकाट असून त्यांच्या अटकेसाठी ग्रामस्थांनी कर्जत पोलीस ठाण्यावर निषेध मोर्चा काढला. यावेळी महिलांसह पुरुषांनी पोलीस प्रशासनावर कडक ताशेरे ओढत अटकेची मागणी केली. जीव गेल्यावरच पोलीस यांना अटक करतील का ? असा सवाल उभा करीत पुढील काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा कापरेवाडीच्या ग्रामस्थांनी दिला.

कर्जत तालुक्यातील कापरेवाडी येथे अजित अशोक वांगडे यांच्यावार ७ ऑक्टोबरला तर ग्रामपंचायत सदस्य दादा लक्ष्मण शिंदे यांच्यावर ८ ऑक्टोबर रोजी सरपंच अनिल अशोक खराडे आणि त्याचे साथीदार नवनाथ मच्छिंद्र मोडके, विकास प्रमोद तोरडमल, महेश चंद्रकांत शिंदे, दत्तात्रय अनंता मोडके यांनी रस्त्यावर अडवत प्राणघातक हल्ला केल्याची फिर्याद कर्जत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. घटनेचे गांभीर्य ओळखत कर्जत पोलिसांनी वरील आरोपींना अटक करणे गरजेचे असताना आजमितीस कोणालाही अटक करण्यात न आल्याचे निदर्शनास आले असता मंगळवारी कापरेवाडीच्या ग्रामस्थांनी पोलीस तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण करीत निषेध मोर्चा काढला. यात महिला आणि पुरुषांनी कर्जत पोलिसांवर कडक ताशेरे ओढत सदरच्या गुन्ह्यातील आरोपींवर यापूर्वी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून कर्जत पोलीस त्यांना पाठीशी घालत असल्याचे बजरंग कदम, संतोष खळगे, रेश्मा कदम, सुनीता शिंदे, कांताबाई वांगडे यांनी म्हंटले. या घटनेने कापरेवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून घरचे कर्ते पुरुषच सुरक्षित नसून महिला-मुलींचे आणि लहान मुलांचे काय ? असा सवाल ग्रामस्थांनी उभा केला. या घटनेतील आरोपीना तात्काळ अटक करावी. तसेच गंभीर गुन्ह्यातील आरोपीना मोक्का लावण्याची मागणी केली. कर्जत पोलिसांनी दोन दिवसांत वरील आरोपींना अटक न केल्यास पुढील काळात कापरेवाडी ग्रामस्थ कुटुंबासह रस्त्यावर उतरत तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला. या आशयाचे निवेदन पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड यांना देण्यात आले.

कर्जत पोलीस बघ्यांची भूमिका घेत असून जीव गेल्यावरच आमची सुरक्षा करणार का ?

दोन घटनेने कापरेवाडी परिसरात सरपंच अनिल खराडे आणि त्यांचे साथीदार यांची दहशत निर्माण झाली आहे. महिला-मुली दहशतीच्या वातावरणात असून रीतसर फिर्याद दाखल केली तरी पोलीस अटक करत नसल्याने तपासाविषयी संभ्रम होत आहे. जीव जाईपर्यंत पोलीस बंघ्याचीच भूमिका घेणार आहे का ? असा सवाल बजरंग कदम यांनी उपस्थित केला.

द•ख•ल



हातगाव केंद्राचा स्पेलिंग बी केंद्रीय स्पर्धेचा निकाल जाहीर

हातगाव : शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा हातगाव येथे आयोजित स्पेलिंग बी केंद्रीय स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक करण्यात आले. आले असल्याबाबतची माहिती हातगाव जि. प. शाळेचे मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम यांनी दिली आहे.या कार्यक्रमाला नव्यानेच हजर झालेले केंद्रप्रमुख कपिल फुलकंठवार यांचेसह केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळेतील बाबासाहेब तांबे, भागवत घुले, बाळासाहेब वाघुंबरे, सुधाकर शेटे, पांडुरंग चव्हाण, देविदास फुंदे, सुंदर सोळंके, धनाजी सूर्यवंशी, सुभाष काकडे, बाबासाहेब लहासे, अंबादास कांबळे, संजीवन शेलार, दत्ता लेंडाळ, प्रज्ञा वाघमारे, वर्षा नागरे, पूजा कदम, सारिका लोखंडे या शिक्षकांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी शेवगाव रोटरी क्लबच्या वतीने गर्कळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होण्याचे व इंग्रजी भाषेतील शब्दलेखन कौशल्य विकसित करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गर्कळ यांनी केले, तर आभार भागवत घुले सर यांनी केले.

खरवंडी कासार सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी राजेंद्र जगताप



खरवंडी कासार : पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथील सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले राजेंद जगताप यांची खरवंडी कासार सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल खरवंडी कासार व परिसरातील ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. जगताप यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवला आहे. विविध सामाजिक चळवळी आणि संघटनांमध्ये त्यांनी आपली भूमिका बजावली असून ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच पदाच्या कार्यकाळातही त्यांनी स्थानिक प्रश्नांमध्ये सहभाग घेतला. त्यांच्या या निवडीमुळे सहकार क्षेत्रात त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या पुढील सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील वाटचालीस खरवंडी कासार परिसर ग्रामस्थांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

बोल्हाई देवीच्या मंदिरात घटस्थापना

निघोज : पारनेर तालुक्यातील जवळे-गुणोरे मुख्य रस्त्यालगत असलेल्या बोल्हाई माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही विधिवत घटस्थापना करण्यात आली. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी सुरू झालेली घटस्थापनेची परंपरा जवळे येथील शेलार परिवाराने आजही श्रद्धेने जपली आहे. या पुरातन मंदिराचा भाविक आणि जवळे येथील तिळवण तेली समाजाच्या वतीने मागील वर्षी जीर्णोद्धार करण्यात आला. शेलार परिवारातील सौ. अश्विनी शिरीष शेलार, योगिता महेश शेलार सौ जयश्री राजेंद्र शेलार सौ प्रतिभा संजय शेलार यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. वाडे बोल्हाई येथील बोल्हाई मातेचे प्रति ठाणे म्हणून या मंदिराला विशेष महत्त्व आहे. नवरात्रोत्सवात तसेच वर्षभर परिसरातील अनेक भाविक या मंदिरात येऊन श्रद्धेने बोल्हाई मातेचे दर्शन घेतात आणि आपली भक्तिभावना व्यक्त करतात.

स्त्रीशक्तीचा सन्मान विचारांत आणि कृतीत प्रतिबिंबित व्हावा : स्नेहलताई शेळके



निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त 'उत्सव विचारांचा, जागर स्त्रीशक्तीचा' या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सौ. स्नेहलताई शेळके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. स्त्रीशक्तीचा सन्मान हा केवळ उत्सवापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येकाच्या विचारांत आणि कृतीत प्रतिबिंबित व्हावा, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांची व्याख्याने, प्रश्नमंजुषा स्पर्धा, थाळी सजावट, रांगोळी स्पर्धा, पत्रलेखन आणि पोस्टर स्पर्धा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

बंद होण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या येळी जिल्हा परिषद शाळेची पुन्हा भरारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



खरवंडी कासार : पाथर्डी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या घटत असताना येळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने मात्र वेगळा आदर्श निर्माण केला आहे. बंद होण्याच्या उंबरठ्यावर असलेली ही शाळा शिक्षिका सौ. सुरेखा कल्याण कराड यांच्या गुणवत्तापूर्ण अध्यापनामुळे आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागामुळे पुन्हा बोलू लागली आहे.

शाळेच्या पटसंख्येत मोठी वाढ झाली असुन मागील शैक्षणिक वर्षात या शाळेची एकूण पटसंख्या केवळ ६ होती. पहिलीच्या वर्गात एकही विद्यार्थी नव्हता. मात्र यंदा जुलै २०२६ अखेर इयत्ता पहिलीच्याच वर्गात १४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून शाळेची एकूण पटसंख्या ३० झाली आहे.

येथिल शिक्षीका कराड मॅडम यापूर्वी बोंदरावाडी शाळेत असताना २५ पट असलेली शाळा ५० पटावर नेण्याचे काम केले होते, अशी माहिती केंद्रप्रमुख श्रीधर कराड यांनी दिली.

या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असुन सर्व विद्यार्थी वाचन, लेखन व गणिती क्रिया उत्तमरित्या करतात. इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल दरवर्षी उत्कृष्ट लागतो. शाळेत सुंदर परिपाठ, अप्रतिम कवायत सादर केली जाते. विद्यार्थ्यांची उपस्थिती १०० टक्के असते. वनस्पतीकला, हस्ताक्षर, चित्रकला, क्रीडा व स्वच्छतेचे धडे यावर विशेष भर दिला जातो. लोकसहभाग, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीमुळे पालकांचा विश्वास वाढला आहे, असे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विमल गर्जे यांनी सांगितले.

लोकसहभागातून विकास होत असून शाळेत पाण्याचा प्रश्न असतानाही चांगल्या प्रकारे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

सलग दहा वर्षांपासून रस्ते खुले ठेवण्याची परंपरा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भवाणीमाता मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले असून, विविध वस्तींच्या रस्त्यांवरील काटेरी झुडपे हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. माजी सरपंच तथा प्रशासक विजयराव शेंडे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांपासून सालाबादप्रमाणे ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

नवरात्रोत्सवात भवाणीमातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी वर्दळ असते. मात्र, मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या कडेला काटेरी झुडपांची वाढ झाल्याने भाविकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्ते मोकळे करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. याची दखल घेत विजयराव शेंडे यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यांवरील काटेरी झुडपे हटविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या मोहिमेत भवाणीमाता रोड, भदेमळा रोड, रसाळमळा रोड, बोबडे मळा रोड, बेटवस्ती रोड, कासारमळा रोड, धेंडे वस्ती-पेडगाव रोड आणि मधला रसाळमळा रोड या रस्त्यांचा समावेश आहे. सलग दहा वर्षांपासून ही मोहीम सुरू असल्याने यंदाही रस्ते मोकळे करण्याच्या उपक्रमाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे भाविकांसह ग्रामस्थांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

न्यू आर्ट्स कॉलेज शेवगाव महाविद्यालयात चर्चासत्र

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव मधील वाणिज्य विभाग आणि पुणे येथील निलया एज्युकेशन इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी -ख तंत्रज्ञान आणि ड-झ, ढ्रश्र्शू -लर्लीपींळपस या विषयावर दोन सत्रामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले .या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे यांनी -ख तंत्रज्ञानाची शिक्षणातील गरज त्याचबरोबर वाणिज्य क्षेत्रातील बदलत्या अकाउंटिंग पद्धती याविषयी भविष्यकालीन गरज ओळखून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपले ज्ञान संवर्धित करून अधिकाधिक व्यावसायिक संधी आणि उद्योजकीय संधी यामध्ये आपली भूमिका समर्थपणे यशस्वी करावी याविषयी विद्यार्थ्यांना उदबोधन केले.

सदर कार्यक्रमाचे प्रथम सत्राप्रसंगी निलया फाउंडेशन ,पुणे यांचे प्रा. हेमंत मांडूमूळे ट्रेनर यांनी संगणकीय क्षेत्रातील विविध शैक्षणिक बदल आणि त्याबाबतीत विद्यार्थ्यांची भूमिका याविषयी विविध सॉफ्टवेअर आणि संगणकीय संकल्पना उदाहरणासह स्पष्ट केल्या. तसेच विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाच्या आधारे ज्ञान संकलन आणि ज्ञान संवर्धन या दोन्हीही बाबी संपादित करून यशस्वीपणे जीवनशैली निर्माण करावी याविषयी प्रतिपादन केले. द्वितीय सत्रामध्ये प्रवरा शैक्षणिक संस्थेच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव मधील प्रा.क्षीरसागर मन्मथ क्षीरसागर यांनी या दोन संगणकीय सॉफ्टवेअरचा उपयोग प्रात्यक्षिक पद्धतीने कशा पद्धतीने करावा याविषयी विद्यार्थ्यांना अत्यंत बहुमोल मार्गदर्शन केले.

भगवानगड परिसरात शासकीय चाऱ्यासाठी १५ ऑक्टोबरला रस्ता रोकोचा इशारा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : भगवानगड परिसरात इतर भागांच्या तुलनेत अति तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पशुधन वाचविण्यासाठी या भागात तातडीने शासकीय चारा उपलब्ध करून द्यावा, अन्यथा गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी भेटीचा वड, नांदूर फाटा, खरवंडी कासार व तुळजवाडी परिसरात पशुधनासह जनआक्रोश रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी विकास वाघ, बाळासाहेब गरजे, सुनील पाखरे, गणपत काटे, सतीश जगताप, सुदर्शन खेडकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

नांदूर निंबादैत्य येथे शासनाकडून चारा उपलब्ध न झाल्याने विकास वाघ यांच्या पुढाकाराने लोकसहभागातून सुमारे एक महिना चारा डेपो चालवून पशुपालकांना चारा वाटप केला. आता लोकसहभागातून चारा उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने शासनाने पुढाकार घेऊन भगवानगड परिसरातील पशुधनासाठी तातडीने शासकीय चारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मतदारांच्या हक्कांसाठी रिपाइंचे साखळी उपोषण पाचव्या दिवशीही सुरू



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया (एसआयआर) रद्द करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात साखळी उपोषण सुरू आहे. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाचा मंगळवारी पाचवा दिवस होता.

मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या साखळी उपोषणात सहभागी आंदोलकांनी आपल्या मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली. दिवसभर सुरू असलेले आंदोलन रात्रीदेखील सुरू असून, घोषणांच्या आवाजाने परिसर दणाणून जात आहे. पोवाडे, देशभक्तीपर गीते आणि स्फूर्तिगीतांच्या माध्यमातून आंदोलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मतदार यादीतील कथित त्रुटी आणि पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या या आंदोलनाला पाच दिवस पूर्ण झाले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी भूमिका रिपाइंच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

नवसाला पावणारी जागृत देवता महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान!

रोहन उनवणे । राष्ट्र सह्याद्री



निघोज : ऐतिहासिक वारसा, आध्यात्मिक महात्म्य आणि अढळ भक्तीचा संगम असलेले श्री अंबिका देवी मंदिर, देवीभोयरे हे महाराष्ट्रातील एक प्राचीन आणि जागृत देवस्थान म्हणून सर्वदूर प्रसिद्ध आहे. नवसाला पावणारी माता अंबिका, अशी या देवीची ख्याती असून महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून हजारो भाविक भक्तिभावाने मातेच्या दर्शनासाठी येत असतात.

पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथे माता अंबिकेचे अत्यंत पुरातन मंदिर आहे. या मंदिराला धार्मिक महत्त्वाबरोबरच ऐतिहासिक परंपरेचाही वारसा लाभलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज दक्षिणेच्या मोहिमेवरून परतत असताना शिवनेरी गडावर पोहोचण्यास रात्र होणार असल्याचे लक्षात येताच त्यांनी त्या काळी तटबंदी असलेल्या देवीच्या मंदिरात आपल्या सैन्यासह एका रात्रीचा मुक्काम केला होता, अशी ऐतिहासिक परंपरा सांगितली जाते.

श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या लेखनात या संदर्भाचा उल्लेख असल्याचे सांगितले जाते. संबंधित ग्रंथातील मूळ उल्लेखाची खात्री करून या ऐतिहासिक संदर्भाची अधिकृत नोंद घेणे उचित ठरेल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतींशी जोडली गेलेली ही परंपरा देवस्थानाच्या ऐतिहासिक महत्त्वात भर घालणारी आहे.

अशा या प्राचीन परंपरेचा वारसा लाभलेल्या जागृत देवस्थानाचे महात्म्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण भारतात पसरलेले आहे. गुजरात, पंजाब आणि पानिपत परिसरात स्थायिक झालेल्या मराठी समाजातील अनेक कुटुंबांचे हे श्रद्धास्थान आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली श्रद्धा, मातेवरील अढळ विश्वास आणि नवसपूर्तीची भावना यांमुळे या देवस्थानाशी भाविकांचे अतूट नाते निर्माण झाले आहे.

वर्षभर देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी वर्दळ असते. मातेच्या चरणी नतमस्तक होताना मनाला लाभणारी शांती, समाधान आणि आध्यात्मिक ऊर्जा यांचा अनुभव घेण्यासाठी भाविक मोठ्या श्रद्धेने येथे येतात.

देवस्थानाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने या देवस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान केला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे देवस्थानाच्या विकासाला चालना मिळण्यास मदत झाली असून भाविकांसाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना नवी दिशा मिळाली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री अंबिका देवी ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सव अत्यंत उत्साहात, भक्तिभावाने आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस

अॅड. डी.एम. निगळे — राजूर कोर्ट

राजूर येथील दिवाणी न्यायालय, क. स्तर, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात..... निशाणी क्र. ११
दिवाणी वारस चौ अर्ज, ०७/२०२६

अर्जदार – १) श्रीराम सुरेश हिले, वय ३३, २) सचिन सुरेश हिले, वय २८, ३) ताईबाई सुरेश हिले, वय ५७, ४) फसाबाई सुरेश हिले, वय ५१, ५) रत्ना संतोष पडवळे, वय ३८, ६) बळीराम सुरेश हिले, वय ३१, ७) विश्वास सुरेश हिले, वय २८, सर्व रा. गोंदोशी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

विरूद्ध – सामनेवाले – कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात चौ. अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे वडिल मयत सुरेश काळू हिले हे दि. ०४/०५/२०२६ रोजी मौजे गोंदोशी, ता. अकोले, जि. अ.नगर येथे मयत झाले. ते हयात असताना गोंदोशी येथे रेशन दुकान चालवत होते. त्याचे मृत्युनंतर अर्जदार यांनी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोले, यांचे कडे दुकानाचा परवाना प्रधिकार पत्र क्र अ.नं. ७१ साठी वारस नोंदणी होवून मिळणेकरीता अर्ज केला असता तहसिलदार कार्यालय अकोले येथील पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी मयत सुरेश काळू हिले हयांचे मृत्यूनंतर त्यांचे मागे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत याबाबतचा वारस दाखला मागितला. त्यामुळे मयत सुरेश काळू हिले यांचे वारस म्हणून नोंद होवून मिळणेकरिता अर्जदार हे मयत सुरेश काळु हिले यांचे कायदेशीर वारस आहे व तसे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी अर्जदार हे मयत सुरेश काळू हिले यांचे कायदेशीर वारस नाही. त्यांचे शिवाय दुसरे कोणी वारसदार आहे असे कोणाचे म्हणणे असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी या न्यायालयात नेमलेली तारीख २९/१०/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता अथवा सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत आपण स्वतः अगर कायदेशीर वकीलामार्फत या अर्जात हजर होवून कळवाव्यात, अन्यथा कोणाचेही काही एक म्हणने नाही असे समजून में. कोर्ट अर्जदाराचा पुरावा ऐकुन घेवुन कायद्या प्रमाणे पुढील योग्य तो आदेश पारीत करतील. याची कृपया नोंद घ्यावी. आज दि. ०८/१०/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/- कामगिरी क्लर्क — शिक्का — टुकूमावरुन — सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, राजूर

जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना, सहकारी सोसायटी, सर्व खाजगी व सरकारी बँका, खाजगी सावकार, व्यक्ती व नातेवाईक यांना कळविणेत येते की, **मौजे पेडगाव ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर** येथील खालील नमुद यांच्या मालकीच्या ताब्यातील व कब्जेवहीवाटीतील शेतजमिन मिळकती आहेत

अ. न.	जमिन मालकांचे नाव	सर्वे क्र. व गट क्र.	क्षेत्र हेक्टर आर मध्ये		जमिनीचे एकूण क्षेत्र एकर मध्ये
			ला.	पो. ख.	
१.	श्री दिपक भुजंगराव ओगले	५७५	४.०८,	०.२२	१०.७५
२.	श्री दत्तात्रय तुकाराम ओगले	५७१	३.०८,	०.२२	८.२५
	एकूण क्षेत्र		७.६		१९.००

सदरहू आमचे पक्षकार **Ceigall Green Energy MH1 Limited Office A-898, Tagore Nagar, Ludhiana 141001 Punjab** यांना भाडेपट्टा कराराने देण्याचे विचारात आहेत. तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही हक्क, कर्ज, हितसंबंध दस्त असल्याचे त्यांनी ही नोटीस जाहीर होताच सात दिवसांत मुळ दस्तऐवजासह आमचे पक्षकारांना भेटून आमचे व पक्षकाराचे समाधान करावे. त्यानंतर कोणीही काहीही हरकत घेतल्यास किंवा कोणाचा काही दस्त किंवा व्यवहार असल्यास तो आमचे पक्षकार जाहीर नोटीस प्रसिद्ध करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. भविष्यात जर या वरील शेतजमिन मिळकती संदर्भात काही वाद विवाद उद्भवला तर त्याची संपूर्ण जबाबदारी ही वरील पक्षकारांवर असेल याची नोंद घ्यावी सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे.

दि. : १३/१०/२०२६ — शिक्का — अॅड. सौरभ आबासाहेब काळे पा. ऑफीस : गाळा नं १२ मुक्ताई कॉम्प्लेक्स, सरकारी दवाखान्याजवळ वडाळी रोड, श्रीगोंदा, मो. ९७६६०७५६६३

दखल

मतदार यादीवरील हरकतींसाठी २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

पुणे : महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत होती. सुधारित वेळापत्रकानुसार प्राप्त दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ ही अर्हता तारीख निश्चित करून महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांम ध्ये मतदार यादीचे विशेष सघन पुनरीक्षण जाहीर केले आहे. म हाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर दावे व हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती.

महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी केलेल्या विनंतीनुसार आयोगाने मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३१ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. प्राप्त अर्जांवर नोटीस बजावणे, तपासणी करणे आणि त्यांचा निपटारा करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

मतदार यादीतील नाव, तपशील किंवा अन्य नोंदींबाबत दुरुस्ती करायची असल्यास अथवा हरकत नोंदवायची असल्यास संबंधित मतदारांनी सुधारित वेळापत्रकानुसार विहित प्रक्रियेचा अवलंब करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या सुधारित कार्यक्रम ाची व्यापक प्रसिद्धी करण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

पुणे : महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या वर्षांसाठी प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत सहभागी खेळाडू व व्यक्तींनी १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

राज्यातील उत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात येते. यामध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींसाठी जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, खेळाडू, दिव्यांग खेळाडू आणि साहसी उपक्रमांतील उल्लेखनीय कामगिरीसाठीच्या पुरस्कारांचा समावेश आहे.

शासनाच्या २९ डिसेंबर २०२३ व २५ जानेवारी २०२४ रोजीच्या निर्णयांनुसार निश्चित करण्यात आलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावली, २०२३ नुसार ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in संकेतस्थळावर १५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटे ५९ सेकंदांपर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले आहे.

वर्षा नाईक यांची राष्ट्रीय महिला अध्यक्षपदी नियुक्ती !



कवठे येमाई : पोलीस मित्र संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या पुणे, धनकवडी येथील वरिष्ठ जनसेविका श्रीमती वर्षाताई नाईक यांची संघाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघाचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. शाम तुकाराम घाडगे यांनी आज मंगळवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना नियुक्तिपत्र प्रदान केले.

श्रीमती वर्षाताई नाईक या सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून, महिला सक्षमीकरण, समाजसेवा आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचे मोठे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पोलीस मित्र संघाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीमुळे महिला सक्षमीकरणाच्या कार्याला अधिक बळ मिळेल, तसेच संघटनेच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.नियुक्ति पत्रात संघटनेची ध्येय धोरणे पुढे नेण्यासाठी, वेळोवेळी दिलेल्या सूचना व नियमांचे पालन करण्यासाठी आणि संघटना अधिक बळकट करण्यासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन अध्यक्ष शाम घाडगे यांनी केले आहे.श्रीमती वर्षाताई नाईक यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अध्यक्ष शाम घाडगे,उपाध्यक्ष प्रा.सुभाष शेटे,प्रफुल्ल गवंडी साहेब शिरूर,पुणे शहर टीम व सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, पुढील सामाजिक वाटचालीसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

भीमाशंकर कारखान्याला ३० कोटींचे कर्ज मिळण्याची अपेक्षा; दिवाळीत शेतकऱ्यांना पैसे देण्याचा मार्ग मोकळा!

जानेवारी ते मार्चदरम्यान ऊस गाळपासाठी देणाऱ्या शेतकऱ्यांना जादा दर देणार : दिलीप वळसे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



वळती : पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला राज्य सरकारच्या प्रतिटन ३३५ रुपयांच्या निकषानुसार सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज मिळण्याची अपेक्षा आहे. या कर्जामुळे शेतकऱ्यांना दिवाळीत पैसे देण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. तसेच जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांत ऊस गाळपासाठी देणाऱ्या शेतकऱ्यांना जादा दर देण्याचे धोरण कारखान्याच्या वतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे संस्थापक तथा माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली.

दत्तात्रयनगर-पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचा २७ वा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ आणि गव्हाण पूजन सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी ते बोलत होते.वळसे पाटील म्हणाले की, आंबेगाव तालुक्यात उसाचे क्षेत्र कमी असल्यामुळे यंदाच्या हंगामात बाहेरील ऊस तोडणीला प्राधान्य द्यावे लागणार आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा ऊस उशिरा गाळपासाठी घेतला जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, यासाठी जानेवारी ते मार्चदरम्यान ऊस गाळपासाठी देणाऱ्या शेतकऱ्यांना जादा दर देण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

आंबेगाव तालुक्याचा दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश व्हावा, यासाठी चर्चा सुरू असून, पुढील आठ ते पंधरा दिवसांत याबाबत घोषणा होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दहा लाख टन ऊस गाळपाचे नियोजन

कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, आगामी गळीत हंगामासाठी दहा लाख टन ऊस गाळपाचे नियोजन करण्यात आले आहे. आजूबाजूच्या परिसरात तसेच उत्तर पुणे जिल्ह्यात इतरत्र न मि ळालेला प्रतिटन ३,५०० रुपयांचा चांगला दर भीमाशंकर कारखान्याने दिला आहे. कारखान्यात यापुढेही विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. कारखाना दीर्घकाळ सुरू ठेवायचा असेल, तर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उसाचे जास्तीत जास्त उत्पादन घ्यावे आणि आपला ऊस कारखान्याला गाळपासाठी द्यावा, असे आवाहन बेंडे यांनी केले.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला बाबा खेतानाथजी ट्रस्टचे अध्यक्ष महंत योगी कृष्णनाथजी महाराज, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, लाला अर्बन बँकेचे अध्यक्ष युवराज बाणखेले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, शिरूर बाजार समितीचे माजी सभापती प्रकाशराव पवार, भैरवनाथ पतसंस्थेचे उपाध्यक्ष सागर काजळे, तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नवनाथ हुले, शेतमाल प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतीश रोडे पाटील, ज्येष्ठ नेते प्रतापराव वळसे पाटील, शिवाजीराव ढोबळे, कामगार नेते ॲड. बाळासाहेब बाणखेले, कारखान्याचे कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, सचिव रामनाथ हिंगे पाटील, कारखान्याचे संचालक, ऊस उत्पादक शेतकरी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माजी आमदार पोपटराव गावडे, सूर्यकांत पलांडे, विवेक वळसे पाटील, आदिनाथ महाराज जुन्नरकर, संतदास महाराज मनसुख आणि अश्विनी महाराज टाव्हरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन निलेश पडवळ यांनी केले, तर कारखान्याचे उपाध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील यांनी आभार मानले.

भारतीय जैन संघटना विद्यालयात स्वच्छता सप्ताह उत्साहात

गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धेतर्गत विविध उपक्रम; विद्यार्थ्यांच्या सहभागातून स्वच्छतेचा जागर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वाघोली, पुणे : स्वच्छतेची संस्कृती रुजविणे, पर्यावरण संवर्धनाविषयी सामाजिक जाणीव निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विकसित करण्याच्या उद्देशाने भारतीय जैन संघटना माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वाघोली येथे गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय स्पर्धा २०२६-२७ अंतर्गत दि. २३ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत स्वच्छता सप्ताह विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात संपन्न झाला. या अभियानात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे सम ाजापर्यंत पोहोचविला.स्वच्छता सप्ताहाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन स्वच्छतागीताच्या माध्यमातून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प केला. चित्रकला व रांगोळी स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांनी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषणमुक्त परिसराचे महत्त्व कलात्मक पद्धतीने अधोरेखित केले. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून ओला व सुका कचरा वर्गीकरण, कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट आणि सार्वजनिक स्वच्छता यांविषयी वाघोली परिसरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.शाळेचा परिसर व अंतर्गत भाग स्वच्छ करण्यासाठी विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. वक्तृत्व, घोषवाक्य व निबंध स्पर्धांच्या माध्यम ातून स्वच्छतेविषयीचे विचार प्रभावीपणे म ांडण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. दि. ३० सप्टेंबर रोजी राबविण्यात आलेल्या प्लास्टिक संकलन मोहिमेत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत प्लास्टिक प्रदूषणाचे दुष्परिणाम अधोरेखित केले. सामूहिक श्रमदानातून स्वच्छतेचे महत्त्व केवळ शब्दांतून नव्हे, तर कृतीतूनही पटवून देण्यात आले.स्वच्छता सप्ताहाच्या सांगता दिनी, दि. १ ऑक्टोबर रोजी रांगोळी स्पर्धा आणि महात्मा गांधी जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता, पर्यावरणाप्रती संवेदनशीलता, सामूहिक कार्याची भावना आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत झाली.

विद्यालयाचे प्राचार्य संतोष भंडारी, उपप्राचार्य श्री. गेठे, पर्यवेक्षक. पांडुरंग पवार गांधीतीर्थ अभियान विद्यालय प्रमुख रेश्मा शितोळे तसेच सूर्यकांत शिंदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला.

स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनावी, हा विधायक संदेश या स्वच्छता सप्ताहातून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कृतीशील सहभागातून सामाजिक प्रबोधन आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी आदर्श निर्माण झाला.



मॉडिफाइड सायलेन्सरच्या बुलेटस्वारांवर पोलिसांचा दणका! तीन बुलेट मोटारसायकलींवर कारवाई; १८ हजार रुपयांचा दंड सोमेश्वरनगर : विनोद गोलांडे वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मॉडिफाइड सायलेन्सर बसवून फटाक्यांसारखा मोठा आवाज करणाऱ्या बुलेट मोटारसायकलस्वारांविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत तीन बुलेट मोटारसायकलींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

प्रा. सुभाष अण्णा शेटे यांची पोलीस मित्र संघाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कवठे येमाई : पोलीस मित्र संघ (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुभाष अण्णा शेटे यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष पदी निवड झाली असून राष्ट्रीय मीडिया प्रमुख व राष्ट्रीय ज्येष्ठ सल्लागार पदांची त्त्वरिक्त जबाबदारी ही त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पोलीस मित्र संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शाम व्यंकट घाडगे यांनी आज मंगळवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली.

प्रा. सुभाष अण्णा शेटे हे पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि जनहिताच्या प्रश्नांवर मागील २० वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. पत्रकार संरक्षण व माहिती अधिकार विभागाच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न, सामाजिक समस्या आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

राष्ट्रीय मीडिया प्रमुख व राष्ट्रीय ज्येष्ठ सल्लागार पदाची ही अतिरिक्त जबाबदारी!

नियुक्ती पत्रात संघाच्या ध्येय धोरणा नुसार कार्य करणे, संघटनात्मक नियमांचे पालन करणे, संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आणि दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करणे,असे आवाहन अध्यक्ष घाडगे यांनी केले आहे. या नियुक्तीम ुळे प्रा. सुभाष अण्णा शेटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग संघटनेच्या विस्तारासाठी, पत्रकारांच्या हित संरक्षणासाठी आणि सामाजिक कार्याला अधिक गती देण्यासाठी होईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.लाभलेल्या पदाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी आणि जनहिताच्या कार्यासाठी करण्याचा संकल्प प्रा. सुभाष अण्णा शेटे यांनी अधिक जोमाने पुढे न्यावा, अशा त्यांना पुढील वाटचालीसाठी शिरूर तालुका पोलीस मित्र संघाच्या सर्वच सदस्य पदाधिकाऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

जारकरवाडीत बिबट्याची दहशत; शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

जिल्हा परिषद शाळेमागील लबडे-वणवे मळ्यात बिबट मादीचा वावर; तातडीने पिंजरा लावण्याची शेतकऱ्यांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी धामणी : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागील लबडे-वणवे मळ्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून बिबट मादीचा वावर वाढल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर बिबट मादीसोबत तिची पिल्लेही असल्याचे शेतकरी अविनाश वणवे यांनी सांगितले. दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळी अचानक बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

या परिसरातून लहान शालेय विद्यार्थी दररोज शाळेत ये-जा करतात. बिबट मादीसोबत पिल्ले असल्याने ती अधिक आक्रमक होण्याची शक्यता लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनाही जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे.

बिबट्याचा वावर वाढत असतानाही संभाव्य धोका टाळण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. संबंधित ठिकाणी त्वरित पिंजरा लावावा, बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी वनविभागाकडे केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न असल्याने वनविभागाने कोणत्याही अनुचित घटनेची वाट न पाहता तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

मळगंगा देवी शारदीय नवरात्र महोत्सवाला कवठे येमाईत भक्तिमय उत्साह

नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी; भजन, आरती, महापूजा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कवठे येमाई : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे श्री मळगंगा देवी शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी तसेच विविध धार्मिक कार्यक्रम ांचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.आश्विन शुद्ध प्रतिपदा ते विजयादशमी या कालावधीत देवीच्या उपासनेला विशेष महत्त्व असते. याच धार्मिक परंपरेचे जतन करत मळंगगा ग्रुप, घोडेआळी व समस्त ग्रामस्थ, कवठे येमाई यांच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दररोज धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल :

महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी सनई वादन, गोंधळी आरती आणि महापूजा, तसेच सायंकाळी सनई वादन, आरतीपूजा, नैवेद्य आणि गोंधळ असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय विविध भजनी मंडळांच्या सहभागातून भजनसेवा, कीर्तन आणि इतर धार्मिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

घटस्थापनेपासून विजयादशमी पर्यंत विशेष कार्यक्रम :

नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी घटस्थापना व देवीची विधिवत पूजा करण्यात येणार आहे. त्यानंतर विविध भजनी मंडळांच्या सेवेतून भक्तिरसाची उधळण होणार आहे. म होत्सवात दुर्गा सप्तशती पारायण, देवीची आरती, भजन आणि गोंधळ यांसारख्या पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. कार्यक्रमपत्रिकेनुसार विविध दिवशी स्थानिक भजनी मंडळे, सेवाकेंद्रे आणि कीर्तनकार सहभागी होणार असून, विजयादशमीच्या दिवशीही धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन :

देवीच्या भक्तीतून एकात्मता, परंपरेतून संस्कृतीचे जतन आणि उत्सवातून ग्राम एकता! या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात सर्व भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून देवीचे दर्शन घ्यावे आणि धार्मिक कार्यक्रम ांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मळंगगा ग्रुप, घोडे आळी व समस्त ग्रामस्थ, कवठे येमाई.यांच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्याधाम प्रशालेची तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत आगेकूच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरूर : शिरूर येथील विद्याधाम प्रशालेच्या खेळाडूंनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत एकूण १३ पदकांची कमाई केली. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सात खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, हे खेळाडू जिल्हास्तरावर शिरूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

शिरूर येथील सी. टी. बोरा महाविद्यालयाच्या मैदानावर दि. ६ व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विद्याधाम प्रशालेच्या खेळाडूंनी विविध क्रीडाप्रकारांत उल्लेखनीय कामगिरी केली. १४ वर्षांखालील वयोगटात श्रीयश जाधव याने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षांखालील वयोगटात वैष्णवी रासकर हिने थाळीफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला, तर सार्थक व्यवहारे याने लांब उडीत द्वितीय आणि चैतन्य लोखंडे याने भालाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला.

जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते, की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक मेघा रोहित जैसी व रोहित हरिप्रसाद जैसी रा. सी -१ सदनिका नं. १०२ लँड मार्क गार्डन कल्याणी नगर येरवडा पुणे ४११००० ६. हे सदर मिळकतीचे एकमेव मालक आहेत. परिशिष्ट अ) तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका-हवेली, पुणे महानगर पालिका हददीतील व मे. सब रजिस्ट्रार, हवेली क्र. १ ते २६ यांचे कार्यक्षेत्रातील, जिल्हा-पुणे, गाव मौजे येरवडा येथील सिटी सर्व्हे नं. २०७ हिस्सा नं.१/२/३/४ प्लॉट नं. ७८ या मिळकतीवर बाँधलेल्या लँडमार्क गार्डन सहकारी गृहरचना संस्था मर्या. या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटी मधील सी-१ इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील अपार्टमेंट/फ्लॅट नं. १०२(२) व १०२ (३) म्हणजेच सदनिका क्र. ०२ व ०३ यांसी क्षेत्र ६८.४० चौ.मी. व ४३.८६ चौ.मी. असे एकूण क्षेत्र ११२.२६ चौ.मी. बिल्टअप + लगतचे टेरेस क्षेत्र ३५.४० चौ. मी. व सोसायटीने अलोट केलेल पोर्पने पार्किंग स्पेस यासह हि मिळकत.
सदरचे मिळकतीची खालील प्रमाणेः ०५/१०/२०२६ राहत्या घरातून म्हणजेच सी -१ सदनिका नं. १०२ लँडमार्क गार्डन कल्याणी नगर येरवडा पुणे - ४११०००६ . येथुन गहाळ झालेले आहेत. त्याकामी त्याचे खालीलप्रमाणे दस्ताचे वर्णन:१. मुळ शेअर सर्टिफिकेट यांसी शेअर प्रमाणपत्र नं. २०७ & २०८ लँडमार्क को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. यांनी दिलेलं प्रमाणपत्र कागदपत्रे हरवलेली आहेत.
सदचे मिळकतीचे जर कोणास वर नमुद मुळ शेअर सर्टिफिकेट कागदपत्रे मिळाल्यास/सापडल्यास त्वरीत वर नमुद पत्यावर आणुन दयावीत. यदाकदाचित जर कोणी या कागदपत्रांच्या आधारे काही चुकीचा वापर किंवा कोणी गैरवापर केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. तसेच सदर कागदपत्रांच्या आधारे आमचे व्यतिरिक्त सदर मिळकतीबाबत कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने सदर कागदपत्रे गहाण, तारण, विक्री, केल्यास त्याचा आमचेशी काहीही संबंध नाही सदर बाब आमचेवर बंधनकारक नाही. सदर दस्तांबाबत आमचे अशिलांनी दि. ०५/१०/२०२६ रोजी लॉस्ट रिपोर्ट नं. १४५०२० /२०२६ बंडगार्डन पोलीस ठाणे अतर्गत तक्रार नोंदविलेली आहे.
जर कोणासही सदर मिळकतीबाबत तक्रार असल्यास 7 (Seven) दिवसांच्या आत समक्ष भेटावे. याची दखल घ्यावी.

मे. पोटे पाटील ला स्क्रेअर एल एल पी तर्फे भागीदार
ॲड. दामोदर नामदेव पोटे
CTS क्र. 291, ऑफ क्र. 6, दुसरा मजला, जयदीप अपार्टमेंट, दिलीप स्मृती भवन व्ही.एस. कोठारी रोड, कोर्ट राम मंदिरा जवळ, नारायण पेठ पुणे-411030.
मो. ९९२२५००६२७ . ईमेल – advdnpote@gmail.com

दि. १४/१०/२०२६

भगर पिठाचे नमुने तपासणीसाठी

घालमे यांच्या दुकानासह नागरिकांच्या घरातूनही नमुने संकलित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा फॅक्टरी येथील घालमे यांच्या किराणा दुकानातून भगर पीठ खरेदी करून खाल्ल्यानंतर अनेक नागरिकांना उलट्या, जुलाब, चक्कर येणे आदी त्रास झाल्याची घटना समोर आली होती. त्रास झालेल्या नागरिकांना श्रीगोंदा फॅक्टरी, श्रीगोंदा तसेच दौंड येथील रुग्णालयांत दाखल करण्यात आले होते. या घटनेची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आज संबंधित दुकानातील तसेच नागरिकांच्या घरातील भगर पिठाचे नमुने तपासणीसाठी संकलित केले.

अहिल्यानगरचे आयुक्त सोपान इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका निरीक्षक प्रदीप पवार यांनी ही कार्यवाही केली. संकलित केलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्षांच्या आधारे अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भगर पीठ खाल्ल्यानंतर नागरिकांना झालेल्या त्रासाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्रयोगशाळेच्या अहवालातूनच भगर पिठाच्या गुणवत्तेबाबत आणि संभाव्य दूषितपणाबाबत स्पष्टता येणार आहे. त्यामुळे नमुना तपासणीचा अहवाल काय येतो आणि प्रशासन पुढे कोणती कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

श्रीगोंदा फॅक्टरीतील अनेकांना त्रास अहवालानंतर अन्न सुरक्षा मानकांनुसार कारवाई होणार

दंड भरा आणि विषय संपवा? चर्चेने उपस्थित केले प्रश्न

संबंधित दुकानदाराला दंड भरण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून आग्रह केला जात असल्याची ऐकीव चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र, या चर्चेला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे प्रशासनाकडून अशी काही सूचना किंवा कारवाई करण्यात आली आहे का, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. अनेक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असताना केवळ दंड आकारून प्रकरण संपवले जाणार का, की प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सखोल चौकशी करून नियमानुसार कारवाई होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात प्रशासनाने तपासणीचा अहवाल आणि त्यानंतरची कारवाई पारदर्शकपणे जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



आनंदवाडीच्या सहा वर्षांच्या मायराची जागतिक भरारी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : वय अवघे सहा वर्षे, पण कर्तृत्व जागतिक स्तरावर! श्रीगोंदा तालुक्यातील आनंदवाडी येथील मायरा सोनाली निलेश जाधव हिने स्केटिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत सहा विविध जागतिक विक्रमांमध्ये नाव नोंदवले आहे. जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मायराने मिळवलेले हे यश परिसरासाठी अभिमानाची बाब ठरले असून, तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. मायरा ही आनंदवाडीचे माजी सरपंच मच्छिंद्र जाधव यांची नात आहे.

मायराने ३१ मे २०२६ रोजी कर्नाटकातील बेळगाव येथे झालेल्या स्पर्धेत १०० मीटर फास्टेस्ट बॅकवर्ड इनलाइन स्केटिंग प्रकारात अवघ्या १७.९३ सेकंदांत १०० मीटर अंतर पूर्ण केले. या कामगिरीची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याचे सांगण्यात आले आहे. इतक्या कमी वयात वेग, संतुलन आणि कौशल्याचा सुरेख मिलाफ साधत तिने मिळवलेले यश विशेष लक्षवेधी ठरले आहे.

मायराच्या यशाबद्दल राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप, सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, शिवसेना ठाकरे गटाचे राज्य उपनेते साजन पाचपुते, सहकार महर्षी काष्टी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, जिल्हा परिषद सदस्या पंचशिला रमेश गिरमकर, मेजर शिवाजी नलवडे, महेंद्र गिरमकर यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, शैक्षणिक संस्था आणि विविध संघटनांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.आनंदवाडीची कन्या, जागतिक स्तरावर झेप! अल्पवयात मिळवलेल्या या यशामुळे मायराच्या पुढील कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

दोन महिन्यांपूर्वीची भेट... आता आठवणींचा ठेवा!

भाऊराव कऱ्हाडे यांचे नानांसोबत काम करण्याचे स्वप्न मात्र अधुरेच

दीपक नि. वाघमारे । राष्ट्र सह्याद्री





देवदैठण : काही भेटी मनात कायमच्या घर करून राहतात, काही स्वप्ने सत्यात उतरण्याच्या उंबरठ्यावर असतानाच काळाच्या पडद्याआड जातात आणि काही माणसांची उणीव शब्दांत व्यक्त करतानाही मन भरून येते. अशीच काहीशी हृदयद्रावक परिस्थिती ख्वाडा या राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मराठी चित्रपटाचे प्रसिद्ध चित्रपट निर्माते-दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांची झाली आहे. आगामी 'फकिरा' चित्रपटातील पाटलाची भूमिका निश्चित झालेल्या अभिनेते नाना पाटेकर यांच्या अकस्मात निधनामुळे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांचे त्यांच्यासोबत काम करण्याचे स्वप्न मात्र अधुरे राहिले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतून उतरलेली 'फकिरा' ही केवळ कादंबरी नाही, तर संघर्ष, स्वाभिमान, सामाजिक विषमता आणि वंचितांच्या जगण्याचे वास्तव मांडणारी एक अजरामर साहित्यकृती आहे. अशा साहित्यकृतीला रुपेरी पडद्यावर आणण्याचे शिवधनुष्य गव्हाणेवाडी (ता. श्रीगोंदा) येथिल भाऊराव कऱ्हाडे यांनी उचलले आहे. त्या चित्रपटाच्या निर्मितीचे काम सध्या वेगात सुरू असून लवकरच चित्रीकरणास सुरुवात होणार आहे. चित्रपटाच्या यशासाठी नामवंत कलाकार यामधे काम करणार असून याचाच एक भाग म्हणून यातील महत्वपूर्ण असणाऱ्या पाटलाच्या भूमिकेसाठी दोन महिन्यापूर्वी भाऊराव कऱ्हाडे यांनी नाना पाटेकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपल्या आगामी चित्रपटात भूमिका करण्याविषयी चर्चा केली होती. या चित्रपटाच्या सुरुवातीपासूनच नाना पाटेकर यांच्यासारख्या कसदार अभिनेत्याने महत्त्वाची भूमिका साकारावी अशी कऱ्हाडे यांची इच्छा होती. अन् नानांचा होकार मिळताच चित्रपटातील 'पाटील' या भूमिकेसाठी त्यांची निवड निश्चित झाली होती. आपल्या दमदार अभिनयाने व्यक्तिरेखेला जिवंत करणाऱ्या नानांच्या साथीने 'फकिरा'तील पाटील पडद्यावर उभा राहणार होता. मात्र ही कलात्मक स्वप्नपूर्ती होण्यापूर्वीच नानांच्या निधनाची बातमी आली आणि संपूर्ण चित्रपट सृष्टीत शोककळा पसरली. तर कऱ्हाडे यांच्या मनात कायमची हुरहूर आणि फकीरा चित्रपट चित्रिकरण स्थळी स्मशान शांतता निर्माण झाली.

भेट झाली, स्वप्न रंगले... पण सहप्रवास अधुराच राहिला

दोन महिन्यांपूर्वी झालेली ती भेट आता आठवणींचा अमूल्य ठेवा बनली आहे. ज्या कलाकारासोबत काम करण्याची आतुरता होती, त्याच्यासोबतचा प्रवास आता सुरू होण्यापूर्वीच थांबला आहे. फकिरा'चा पाटील रूपेरी पडद्यावर येण्याआधीच काळाच्या पडद्याआड गेला. त्यामुळे भेट झाली, स्वप्न रंगले... पण सहप्रवास अधुराच राहिल्याने 'फकिरा'च्या निमित्ताने मनात रंगवलेले स्वप्न आता कायमच अपूर्णतेची सल देत राहणार असल्याची हळहळ व्यक्त करत दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

आठ वजन गटांत महिला खेळाडूंचे कौशल्य

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी शहर : महिला व मुलींना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देऊन त्यांच्या गुणवत्तेला राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पाथर्डी येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियममध्ये जिल्हास्तरीय 'अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स वेटलिफ्टिंग लीग' उत्साहात पार पडली. केंद्र शासनाच्या खेलो इंडिया उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण व भारतीय वेटलिफ्टिंग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेत महिला खेळाडूंनी स्नॅच आणि क्लीन अँड जर्क या प्रकारांत आपले सामर्थ्य, कौशल्य आणि जिद्द दाखवली.

स्पर्धेचे उद्घाटन पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तथा पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, क्रीडा संचालक तथा जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे सचिव डॉ. विजय देशमुख, संघटनेचे उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, प्रा. विवेक साळवे, सोनाली साबळे आणि विजय कनोजिया उपस्थित होते. महिलांमधील क्रीडागुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि तळागाळातील खेळाडूंना स्पर्धेची संधी उपलब्ध करून देणे, ही अशा उपक्रमांची महत्त्वपूर्ण उद्दिष्टे आहेत. स्पर्धेतील निकालांमध्ये सुवर्णपदक विजेत्यांमध्ये समीक्षा थोरात, नुसरत सय्यद, शुभांगी ढाकणे, श्रुती धायतडक, सानिका शिवणकर, पूनम काकडे, अंबिका बोरुडे आणि ऋतुजा धोत्रे यांनी स्थान मिळवले.

रौप्यपदक विजेत्यांमध्ये शिवानी सांगळे, दैवशाला वाघमोडे, अनुराधा घुले, प्रणया हाडदे, तेजस्विनी बोरुडे, ज्ञानेश्वरी नवघरे आणि तन्वी सरोदे यांचा समावेश आहे.

कांस्यपदक विजेत्यांमध्ये कल्याणी घुले, राणी रूपनर, वैष्णवी भताने, तेजस्वी वाकळे, समीक्षा सय्यद आणि श्रावणी पालवे यांनी पदकांची कमाई केली. स्पर्धेसाठी तुषार सपकाळे, प्रवीण चोरमले, प्रा. विवेक साळवे, सोनाली साबळे, कार्तिक तेवर, विजय कनोजिया आणि प्रशांत गायकवाड यांनी पंच म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय देशमुख यांनी केले, तर राजेंद्र सोनवणे यांनी आभार मानले.

पशुसंवर्धन रिक्त पदांच्या नियुक्ती कराव्यात : आ. दाते

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांचा गंभीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आ. काशिनाथ दाते यांनी राज्याच्या पशुसंवर्धन व दुध व्यवसाय विकास मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या भेटीदरम्यान पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांची वस्तुस्थिती मांडत ग्रामीण भागातील पशुधन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने पदभरती करण्याची आग्रही मागणी केली. या मागणीची गांभीर्याने दखल घेत ना. पंकजाताई मुंडे यांनी संबंधित रिक्त पदांवर लवकरात लवकर नियुक्त्या करण्याचे आश्वासन दिले.

पारनेर तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार असलेल्या पशुपालन व्यवसायाला बळकटी देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे सक्षम मनुष्यबळ अत्यावश्यक आहे. मात्र, अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे पशुधनाची आरोग्य तपासणी, वेळेवर उपचार, लसीकरण तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होत आहेत. ही बाब लक्षात घेऊन आ. काशिनाथ दाते यांनी हा प्रश्न थेट मंत्रिमहोदयांसमोर मांडत शेतकरी व पशुपालकांच्या हितासाठी ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली.

पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागात एकूण ५६ पदे मंजूर असून, त्यापैकी केवळ २३ पदे भरलेली आहेत, तर तब्बल ३३ पदे रिक्त आहेत. म्हणजेच मंजूर पदांपैकी सुमारे ५९ टक्के पदे रिक्त असल्याने उपलब्ध अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा मोठा ताण पडत आहे. यामध्ये सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या दोनही मंजूर जागा रिक्त असून, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची १६ पैकी ११ पदे रिक्त आहेत. पशुधन विकास अधिकारी गट-ब या पदाची एक जागा, पशुधन पर्यवेक्षक/सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यांची १६ पैकी १० पदे आणि परिचरांची १६ पैकी ९ पदे रिक्त आहेत. या गंभीर परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील पशुपालकांना वेळेत सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मनुष्यबळ वाढविणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

या भेटीप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक तथा पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड आणि पारनेर शहराचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता शेठ कुलट हे ही उपस्थित होते. पारनेर तालुक्यातील पशुपालकांना अधिक सक्षम, तत्पर आणि प्रभावी पशुधन आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने आ. काशिनाथ दाते यांनी केलेला हा पाठपुरावा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

राशीनमधील मारहाण प्रकरणात पोलिसांच्या कागदपत्रांवरच प्रश्नचिन्ह

जिवंत जखमीला 'मयत' कसे दाखवले?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : राशीन येथील श्रीनिवास रंगय्या सुरागोणी यांना मारहाण करून लूट केल्याच्या कथित प्रकरणात आता पोलिसांच्या कागदपत्रांतील नोंदींवरून गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. बारामती शहर पोलीस स्टेशनकडून कर्जत पोलीस स्टेशनला पाठविण्यात आलेल्या पत्रात जखमी व्यक्तीच्या संदर्भात 'सदर मयताची कागदपत्रे' असा उल्लेख असल्याचे उपलब्ध कागदपत्रांतून दिसते. संबंधित व्यक्ती जखमी अवस्थेत उपचार घेत असताना हा उल्लेख कसा झाला, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

जखमी व्यक्ती की मयत? कागदपत्रांत नेमके काय?

बारामती येथील देशपांडे हॉस्पिटलने दिलेल्या दवाखाना खबरीनुसार, श्रीनिवास सुरागोणी यांना राशीन येथे मारहाण झाल्याचे नमूद आहे. त्यांच्या नाकातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल केल्याचाही उल्लेख आहे.

मात्र, बारामती शहर पोलिसांच्या कर्जत पोलिसांना पाठविण्यात आलेल्या पत्रात संबंधित व्यक्तीच्या कागदपत्रांचा उल्लेख करताना 'मयत' हा शब्द वापरण्यात आला आहे. हा शब्द अनवधानाने लिहिला गेला की कागदपत्रे तयार करताना अन्य काही चूक झाली, याबाबत अधिकृत स्पष्टीकरण आवश्यक आहे.

घटनेच्या वेळेबाबतही विसंगती?

पीडिताच्या आरोपांनुसार, ही घटना ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. मात्र, उपलब्ध दवाखाना पोलिस हवालदार किरण पोपट कदम यांची जबाब घेण्यासाठी नेमणूक करण्यात आली खबरीच्या मजकुरात त्याच दिवशी दुपारी एक वाजताची वेळ नमूद आहे. या दोन वेळांमधील विसंगतीचे कारण काय, याचीही पडताळणी होणे आवश्यक आहे.



जबाब नोंदविण्याची प्रक्रिया तपासण्याची मागणी

पीडिताच्या म्हणण्यानुसार, गंभीर दुखापतीमुळे त्यांना घटनेचा संपूर्ण तपशील सांगता आला नाही. त्यामुळे जबाब नेमका कधी, कोणाच्या उपस्थितीत आणि कोणत्या वैद्यकीय परिस्थितीत नोंदविण्यात आला, याची चौकशी व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

बारामती शहर पोलिसांनी पाठविलेल्या पत्रातील मजकूर, दवाखाना खबर आणि जोडलेल्या जबाबाची प्रत यांची तुलना करून नोंदींची सत्यता तपासणे गरजेचे आहे. तसेच कर्जत पोलिसांनी या प्रकरणात केलेल्या पुढील कार्यवाहीची माहितीही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी!

मारहाण व लुटीच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्याबरोबरच कागदपत्रांतील विसंगती, जबाब नोंदविण्याची प्रक्रिया आणि तपासाची सद्यस्थिती याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी होत आहे.

एका बाजूला गंभीर मारहाणीची तक्रार आणि दुसऱ्या बाजूला अधिकृत पत्रातील 'मयत' हा उल्लेख- या प्रकरणातील वस्तुस्थिती नेमकी काय? संबंधित यंत्रणांनी कागदपत्रांची पडताळणी करून सत्य जनतेसमोर आणणे आवश्यक आहे.

दखल

भाळवणी निघोज प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ईमारतीसाठी मोठ्या निधीची मागणी : आ. दाते

निघोज : पारनेर तालुक्यातील भाळवणी व निघोज ही दोन्ही गावे मोठ्या लोकसंख्येची आहेत. येथील दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात सातत्याने रुग्ण डमीट असतात तसेच शेकडोंच्या संख्येने दररोज रुग्ण



या आरोग्य केंद्रात उपचार घेत असतात मात्र या ठिकाणच्या दोन्ही गावच्या आरोग्य केंद्राच्या ईमारती जुन्या आहेत या ठिकाणी नवीन इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज असल्याची मागणी आमदार काशिनाथ दाते सर यांनी राज्याचे आरोग्यमंत्री व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निघोज व भाळवणी ही दोन्ही गावे तालुक्यातील जास्त लोकवस्तीची तसेच वाडीवस्तीशी संपर्कात गावे असल्याने या ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असूनही विकासाभिमुख कामे निधीअभावी करता येत नाहीत. दोन्ही गावच्या ईमारती या अत्यंत जुन्या झाल्या आहेत. दुरुस्तीसाठी निधी देण्याऐवजी इमारतीसाठी निधीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. दररोज या ठिकाणी शेकडो लोक उपचार घेतात. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्र असल्याने डमीट पेशंटची संख्या मोठी असते मात्र जुनाट ईमारतीमुळे रुग्णांना डमीट करुण घेणे परवडत नाही कारण ईमारत लहान व जुनाट असल्याने उपचाराला अवघड काम होते यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी या दोन्ही गावांतील इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी आमदार दाते सर यांनी केली आहे. यावेळी त्यांच्यासमवेत श्रीगोंदा आमदार विक्रम पाचपुते होते.

नवसाला पावणारी श्रीगोंद्याची ग्रामदेवता आई साळवण देवी!

श्रीगोंदा : श्रीगोंदा शहरापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेले आई साळवण देवीचे प्राचीन मंदिर म्हणजे शहराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा मानबिंदू आहे. रेणुका देवीचे प्रतिरूप मानल्या जाणाऱ्या या जागृत देवस्थानाला श्रीगोंदा शहराची ग्रामदेवता म्हणून विशेष महत्त्व आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत भजन, कीर्तन, विविध धार्मिक विधी आणि देवीच्या जागराने मंदिर परिसर भक्तिमय होतो. नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिद्ध असलेल्या साळवण देवीच्या दर्शनासाठी या काळात भाविकांची मोठी गर्दी होते. मंदिर परिसरातील पुरातन दगडी चाक हे या देवस्थानाचे खास वैशिष्ट्य मानले जाते. माहूरगडावरील रेणुका देवीचा एक निस्सीम भक्त दरवर्षी अश्विन पौर्णिमेला देवीच्या दर्शनासाठी जात असे. त्याची भक्ती पाहून देवी प्रसन्न झाली आणि भक्ताच्या विनंतीवरून त्याच्या गावाकडे येण्यास तयार झाली. मात्र, गाव येईपर्यंत मागे वळून पाहायचे नाही, अशी अट देवीने घातली. भक्ताने ही अट मान्य केली. देवीचा रथ त्याच्या मागून श्रीगोंद्याकडे येत असताना एका ठिकाणी रथाचे चाक जमिनीत रुतले आणि रथाचा आवाज बंद झाला. आवाज थांबल्याने भक्ताने मागे वळून पाहिले असता देवी तेथेच गुप्त झाल्याची आख्यायिका सांगितली जाते.

रोजगार हमी योजनेअंतर्गत चाऱ्यांची दुरुस्ती करावी : सालके

निघोज : रोजगार हमी योजनेअंतर्गत चाऱ्यांची दुरुस्ती करण्याची तसेच दुष्काळी परिस्थिती असल्याने पाणी पट्टी माफ करण्याची मागणी जवळा येथील धर्मनाथ पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष तथा पारनेर तालुका भाजपचे उपाध्यक्ष नवनाथ सालके यांनी निवेदनाद्वारे राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे



पाटील यांच्याकडे केले आहे. याबाबत पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ लवकरच विखे पाटील यांना भेटणार असल्याची माहिती सालके यांनी दिली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की पारनेर तालुक्यातील जवळपास सतरा ते अठरा गावांना कुकडी डावा कालवा व कुकडी नदीचे पाणी मिळत आहे. कुकडी डावा कालवा पाणी मिळण्यासाठी पाट तसेच अंतर्गत चाऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र या चाऱ्यांसाठी निधीच उपलब्ध नसल्याने तसेच या वर्षी राज्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाटपाण्याची अवस्था अवघड झाली आहे. पाण्यावर शासनाचे मोठ्या प्रमाणात निर्बंध राहणार आहेत. मात्र पाणी वापर संस्था कार्यक्षमपणे काम करीत असल्याने पाटपाण्याअंतर्गत चाऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. गेली कित्येक वर्षे यासाठी निधी उपलब्ध नसल्याने कामे ठप्प झाली आहेत. हेड टू टेल असे पाणी या चाऱ्यांच्या माध्यमातून मिळत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जात होते. मात्र सध्या या चाऱ्यांची अवस्था दयनीय झाल्याने पाणीच मिळत नाही म्हणून बहुतांश पाणी वापर संस्था मेटाकुटीला आलेल्या आहेत. दुष्काळात रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांना सरकार चालना देणार असल्याने ही चाऱ्यांची कामे या योजनेअंतर्गत करून चाऱ्यांना पाटासारखे अस्तारीकरण करावे अशी मागणी सालके यांनी केली आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीत मागील वर्षाची पाणीपट्टी तसेच २६-२७ या वर्षाची पाणीपट्टी पाटबंधारे विभागाने माफ करावी जेणेकरून शेतकऱ्यांना आधार मिळेल अशी मागणी सालके यांनी केली आहे.

शिराळात नवरात्रोत्सवाचा दुसरा दिवस उत्साहात



शिराळ चिचोंडी : शिराळ तालुका पाथर्डी येथील दुर्गा माता देवस्थानमध्ये सुरू असलेल्या नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर, उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ह.भ.प. तुलसी देवीजी भागवताचार्य (सोनई) यांची सुमधुर कीर्तनरुपी सेवा मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात संपन्न झाली. या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ शिराळ व परिसरातील शेकडो भाविकांनी घेतला. कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करताना ह.भ.प. तुलसी देवीजी महाराज यांनी मोलाचा अध्यात्मिक संदेश दिला. त्या म्हणाल्या, नवरात्र म्हणजे केवळ बाह्य उपवास, पूजा-अर्चा आणि धार्मिक विधी नव्हेत, तर स्वतःच्या अंतकरणातील अहंकार, द्वेष, मत्सर आणि नकारात्मकता नष्ट करून सदाचाराची साधना करण्याचा हा अत्यंत पवित्र काळ आहे. आजच्या तरुण पिढीच्या, विशेषतः मुलींच्या संस्कारांवर भर देत महाराजांनी परखड व दिशादर्शक विचार मांडले. मुलींनी आई-वडिलांच्या विचारांची आणि संतांच्या संस्कारांची जोपासना केली पाहिजे. कोणतीही कृती करताना आई-वडिलांची मान खाली जाईल, असे कृत्य करू नये, असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. तसेच, देवी पार्वतीचा पूर्वजन्म आणि तिने शिवाला प्राप्त करण्यासाठी केलेली खडतर तपश्चर्या यावर आधारित सुंदर दृष्टांत देत, जीवनातील संकटांना न घाबरता ध्येयाशी कसे प्रामाणिक राहावे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

वर्धापन दिन विषेश...

बुधवार, दि.१४ ऑक्टोबर २०२६ । पान ८

आशिर्वाद — ज्येष्ठ नेते — सभापती, कृ.उ.बा.स. — मा.नगराध्यक्षा — मा.राज्यमंत्री, म.राज्य — उपनगराध्यक्ष रानपा — चेअरमन

कै. सोमनाथ उर्फ कैलासदादा पा. तनपुरे संस्थापक — मा.रा. प्रसादराव तनपुरे — मा.श्री. अरुणसाहेब तनपुरे — मा.डॉ.सौ. उषाताई तनपुरे — मा.आ. प्राजक्तदादा तनपुरे — मा.श्री. हर्षदादा तनपुरे — श्री.बजरंग गंगाधर पा.तनपुरे

कै.सौ.केशरबाई तनपुरे मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. राहुरी

पत्ता : मल्हारवाडी रोड, राहुरी मो. 02426-235999 शाखा : सोनई, राहाता, शनी चौक राहुरी

४६ दिवस ५%	डी.डी. सुविधा
९१ दिवस ६%	आर.टी.जी.एस.
१८१ दिवस ७%	एन.ई.एफ.टी.
३६५ दिवस ९%	चेक
१३ महिने १०%	तात्काळ सोने तारण

दिव्यांग, विधवा, ज्येष्ठ नागरिक, सैन्य दलात ०.५% जादा

१०० कोटी ठेवींकडे वाटचाल

सोने तारणवर जास्तीत जास्त रक्कम देणारी संस्था

श्री. सागर सोमनाथ तनपुरे | नगरसेवक- राहुरी नगरपरिषद
अध्यक्ष-केशर उद्योग समुह

- आशिर्वाद - — - आशिर्वाद -

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

जलसंधारण मंत्री, महाराष्ट्र राज्य — माजी खासदार, नगर दक्षिण — राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघ

मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील — मा.डॉ.सुजयदादा विखे पाटील — मा.आ.अक्षयदादा कर्डिले साहेब

मा. शिवाजीराव उर्फ दादापाटील सोनवणे

मा.विरोधी पक्षनेते : राहुरी नगरपरिषद, राहुरी
मा. चेअरमन : राहुरी पिपल्स बँक
अध्यक्ष : श्रीराम गणेश मंडळ, कासार गल्ली

शुक्लेश्वर चौक मित्र मंडळ, कासार गल्ली, राहुरी

दै.राष्ट्रसह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

मा.श्री.नितीन कल्हापुरे पा.
अध्यक्ष, पांडवराज प्रतिष्ठान देसवंडी

मा.सौ.योगिता कल्हापुरे पा.
लोकनियुक्त सरपंच, देसवंडी ग्रामपंचायत

मु.पो. देसवंडी, ता. राहुरी मोबा. ९१५८५९७७७ / ९२२६७७७३२६

पांडवराज प्रतिष्ठाण, देसवंडी (ता.राहुरी)

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

शिवांकुर विद्यालय

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२ नुसार मान्यताप्राप्त
शिव प्रतिष्ठान संचलित

शिवांकुर विद्यालय, कोंढवड

• नर्सरी • एल.के.जी. • यु.के.जी. • इ. १ ली ते १२ वी
शाखा नं.१ : शनी-शिंगणापूर रोड, बाचकर वस्ती, कोंढवड फाटा, कोंढवड, ता.राहुरी मोबा. ९४०४२८८५०१, ७८८८०४८५०१, ७२७६१८८५०१

शिवांकुर विस्डम स्कूल, खडांबे खु.

• नर्सरी • एल.के.जी. • यु.के.जी.
शाखा नं.२ : राहुरी-वांबोरी रोड, वांबोरी रेल्वे स्टेशन, खडांबे खुर्द, ता.राहुरी मोबा. ७४४७४२८५०१, ९४०४२८८५०१

शिवांकुर रेन्बो स्कूल, राहुरी

• प्ले ग्रुप • नर्सरी • एल.के.जी. • यु.के.जी.
शाखा नं.३ : स्टेशन रोड, १८ एकर समोर, राहुरी, फोन ०२४२६-२९९५०१ मोबा. ९४०४२८८५०१

शिवांकुर अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि., राहुरी

चेअरमन : डॉ.श्री. प्रकाश पवार | व्हा.चेअरमन : श्री. नारायण निमसे
मुख्य शाखा : शिवांकुर हाईटस्, क्रांती चौक, राहुरी, जि.अहिल्यानगर
फोन नं. ०२४२६-२३३६०४ मोबा. ९४२३४४०१९८

दै.राष्ट्रसह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

आमदार प्राजक्तदादा तनपुरे, सदस्य, विधान परिषद

श्री.प्रकाश भुजाडी पा.

संचालक- जोगेश्वरी आखाडा कार्यकारी सह.सेवा सोसायटी
मा.उपनगराध्यक्ष- राहुरी नगरपरिषद राहुरी

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

मा.सौ. स्मिताताई भारत भुजाडी

नगरसेविका - राहुरी नगरपरिषद राहुरी
सभापती - महिला व बालकल्याण समिती, राहुरी नगरपरिषद राहुरी

मा.श्री.भारतशेठ भुजाडी पा. मित्र मंडळ, राहुरी शहर

Heartfelt wishes on the anniversary of the Daily 'Rashtra Sahyadri'.

SAI CONSULTANTS

Consulting Civil Engineer, Builder Developers & Govt. Contractors

Er. SWAPNIL A. BHASKAR
Mob. 9552183333
9881964333

OFFICE ADDRESS : Shop No. 2, Guruprasad Building, Gokul Colony, Rahuri, Dist. Ahilyanagar
E-mail : saiconsultants33388@gmail.com

दै.राष्ट्रसह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

शुभकिर्ती कन्स्ट्रक्शन, राहुरी
(गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर)

शुभकिर्ती लॉन्स व रिसॉर्ट, राहुरी

शुभकिर्ती प्युअर व्हेज रेस्टॉरंट व व्ही.आय.पी. गेस्ट हाऊस, राहुरी

शुभकिर्ती एक्झिक्युटिव्ह, राहुरी

प्रोप्रा. सतीषकाका साहेबराव तनपुरे पा.

-: Contact :-
9850920706
9325144144

चि. शुभम सतिषकाका तनपुरे पा.

कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरी

संस्थापक स्व.डॉ.दादासाहेब तनपुरे

ता.राहुरी, जि.अहिल्यानगर • फोन नं.: राहुरी (०२४२६) २३३४४० / २३३९४०
वांबोरी : (०२४२६) २७२५३८ • ई-मेल : am_rahuri@msamb.com

दै. राष्ट्रसह्याद्रीच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा

मार्गदर्शक: मा.खा. प्रसादराव बाबुराव तनपुरे
सभापती: मा.श्री. अरूण बाबुराव तनपुरे
सदस्य, विधान परिषद: आ.श्री. प्राजक्तदादा प्रसादराव तनपुरे
उपनगराध्यक्ष, रानपा: मा.श्री. हर्षदादा अरूण तनपुरे
उपसभापती: मा.श्री. महेश केरूजी पानसरे

श्री. भिकादास आसाराम जरे (सचिव) — श्री. महेश केरू पानसरे (उपसभापती) — श्री. अरूण बाबुराव तनपुरे (सभापती)

संचालक मंडळ

श्री. बाळासाहेब रखमाजी खुळे
श्री. दत्तात्रय यादव कवाणे
सौ. सुनिता रावसाहेब खेवरे
श्री. रामदास परसराम बाचकर
श्री. मधुकर प्रभाकर पवार
श्री. मारूती रंगनाथ हारदे
श्री. रखमाजी बन्सी जाधव
श्री. सत्यजित चंद्रशेखर कदम
श्री. गोरक्षनाथ तुकाराम पवार
श्री. शामराव शंकरराव निमसे
सौ. शोभा सुभाष डुक्रे
श्री. मंगेश जालिंदरनाथ गाडे
श्री. सुरेशलाल बन्सीलाल बाफना
श्री. दत्तात्रय निवृत्ती शेळके
सौ. शारदा किसन आढाव
श्री. चंद्रकांत प्रभाकर पानसंबळ

श्री. रावसाहेब खेडकर साहेब, सहाय्यक निबंधक राहुरी

जलसंपदा मंत्री, म.राज्य — मा.खासदार, अहिल्यानगर — राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघ — आमदार, विधान परिषद

मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील — मा.खा.डॉ.सुजयदादा विखे पाटील — मा.आ. अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले — मा.आ.प्राजक्तदादा प्रसादराव तनपुरे

दैनिक राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

श्री डेव्हलपर्स

लॅण्ड डेव्हलपर्स
बिल्डर
कॉन्ट्रॅक्टर

श्री. प्रफुल्ल उर्फ भैय्यासाहेब शेळके पा.
मा.शहराध्यक्ष - भारतीय जनता पार्टी राहुरी शहर

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

श्री. गजानन भागवत सातभाई

मा.उपनगराध्यक्ष, राहुरी नगरपरिषद राहुरी

शुभेच्छूक मा.गजानन सातभाई मित्र मंडळ, राहुरी शहर

दै. राष्ट्रसह्याद्रीच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा

डॉ.कोरडे

ओम स्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ.प्रविणकुमार कोरडे
एम.बी.बी.एस., एम.डी.(मेडीसीन) | बी.जे. मेडीकल कॉलेज (पुणे)
कन्सल्टंट फिजिशियन | मधूमेह व हृदयरोग, डायबेटीस तज्ञ

पत्ता : कॉलेज रोड, राहुरी, जि.अहिल्यानगर मो.९२७३०१४८००

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

भीम आर्मी

खासदार

मा.नागेश कंडारे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाईगार चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना
मा.विनय रतनसिंह, राष्ट्रीय अध्यक्ष
मा.अॅड.चंद्रशेखरभाई आझाद, संस्थापक अध्यक्ष, भीम आर्मी

मा.तानसेन भाई बिवाल

राज्य उपाध्यक्ष, कर्मचारी संघटना
जिल्हा अध्यक्ष, भीम आर्मी

सर्व पदाधिकारी व भीमसैनिक भीम आर्मी अहिल्यानगर जिल्हा

श्री.रविंद्र म्हसे पा.

जिल्हा चिटणीस- भाजपा अहिल्यानगर
मा. संचालक- डॉ.बा.बा.तनपुरे सह.सा.कारखाना
तालुकाध्यक्ष- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, राहुरी तालुका

मु.पो. आरडगांव, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर

जय बालाजी

स्वीटस् अॅण्ड नमकीन

ज्ञानेश्वर थिएटर समोर, नवी पेठ, राहुरी. (02422) 233301

नाकोडा स्वीटस्

छत्रपती शिवाजी चौक, राहुरी. मो. 9730928201

आमचेकडे सर्व प्रकारची मिठाई एवम् फरसाण मिळेल. गरम कचोरी, समोसा, ढोकला इ. मिळेल.

मांगीलाल राजपुरोहित

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

श्री.बबन कोंडीराम गुलदगड

नगरसेवक, राहुरी नगरपरिषद राहुरी

मा.श्री. बबनराव गुलदगड मित्र मंडळ, राहुरी शहर

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

जलसंपदा मंत्री — माजी खासदार — ज्येष्ठनेते — मार्गदर्शक — आमदार — मार्गदर्शक

मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील — मा.डॉ. सुजयदादा विखे पाटील — मा.अॅड.सुभाषराव पाटील साहेब — मा.आ.चंद्रशेखर कदम पा. — मा.आ.अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले — मा. बाळकृष्ण पा. बानकर

सुरेश पंढरीनाथ पा. बानकर

मा.अध्यक्ष - भारतीय जनता पार्टी राहुरी तालुका
मा.सदस्य - पंचायत समिती, राहुरी
मा.संचालक - कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरी
मा.चेअरमन - ब्राम्हणी विविध कार्य.सह.सोसायटी

मु.पो. ब्राम्हणी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

श्री रेणुकामाता बांबू डेपो

आमचेकडे बांबू, बल्ल्या, शिड्या, चटई, परांज्या तसेच डाळींब टोमॅटो वेलांची काठी ठोक व किरकोळ भावात मिळतील.

श्री.गणेश राजेंद्र खैरे
मो.८९५६२३३५५६
७३५०४०२१२०

प्रोप्रा. राजेंद्र शंकरराव खैरे

मिशन कंपाऊंड, जुन्या कोर्टासमोर, नगर-मनमाड रोड, राहुरी, जि.अहिल्यानगर

राहुरी तालुका विकास मंडळ

श्री.रावसाहेब चाचा तनपुरे

अध्यक्ष- राहुरी तालुका विकास मंडळ
अध्यक्ष- ग्रामदैवत श्री मार्तंड महाराज देवस्थान ट्रस्ट,राहुरी
संचालक- राहुरी एम.पी. सोसायटी
संचालक- डॉ.बा.बा.तनपुरे सह.सा.कारखाना लि., श्रीशिवाजीनगर
चेअरमन - व्यंकटेश मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि.

प्रतिक रावसाहेब तनपुरे
नगरसेवक- राहुरी नगरपरिषद, राहुरी

दै.राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

मा.श्री. रावसाहेब राधुजी पा. तनपुरे

मा. उपनगराध्यक्ष, राहुरी नगरपरिषद राहुरी
मा.संचालक, मुळा-प्रवरा इले. को-ऑप सोसायटी

सौ.अर्चना रावसाहेब तनपुरे, मा. नगरसेविका, राहुरी नगरपरिषद राहुरी
श्री.अक्षय रावसाहेब तनपुरे, मा. नगरसेवक, राहुरी नगरपरिषद राहुरी
चि.ऋषिकेश रावसाहेब तनपुरे, संचालक- आरती मेडीकल, राहुरी

सातपीर बाबा गणेशोत्सव मंडळ । आर.आर. तनपुरे मित्र मंडळ, राहुरी तालुका

चोख सोन्या इतकंच
अस्सल बावन्नकशी विश्वासार्ह नांव...

एस.एस. उदावंत ज्वेलर्स

प्रोप्रा. संजीव उदावंत

शिवाजी चौक, मेनरोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
फोन : (०२४२६) २३३९६९ मो.९६७३७७१०६९

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

पी.एस. उदावंत ज्वेलर्स

सौंदर्याचं कोंदण

प्रोप्रा. प्रफुल्ल उदावंत 940 360 4340

गुलदगड कॉम्प्लेक्स, प्रगति विद्यालय रोड, राहुरी. फोन : (02426) 234969

धनश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्या., राहुरी

कार्यालय : गुलदगड इस्टेट, सौ.भागिरथीबाई तनपुरे कन्या शाळा रोड, गोकूळ कॉलनी, राहुरी. फोन नं.: (०२४२६) २३४०५८

सन्मा. संचालक मंडळ

श्री. तुषार सुभाष जाधव
श्री. भोंगळ ज्ञानदेव नामदेव
सौ. ताराबाई ज्ञानदेव भोंगळ
श्री. सोमनाथ गेणूजी अनाप
श्री. किशोर सूर्यभान तमनर
श्री. राजेंद्र मच्छिंद्र काळे
श्री. रावसाहेब हरिभाऊ खळकर
सौ. कल्पना राजेंद्र जाधव
श्री. विजय शंकर पवार
श्री. महेश शिवाजी गाढे (व्यवस्थापक)
श्री. संजय हरिभाऊ बुऱ्हाडे (गोल्ड व्हॅल्युयर)

श्री.राजेंद्र विठ्ठल जाधव, संस्थापक चेअरमन
श्री. सुमित माऊलीसाहेब भुजाडी, व्हा.चेअरमन

सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, दैनिक बचत ठेव प्रतिनिधी व कर्मचारी वृंद

श्री संत भगवान बाबा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. राहुरी

कार्यालय : उदावंत कॉम्प्लेक्स, नगर-मनमाड रोड, मार्केट यार्ड समोर, राहुरी, जि. अहिल्यानगर
फोन नं.: (०२४२६) २३४१५५ मो. ९८९००४५५२५, ९५५२५४५५२५

मा.श्री. दिलीप शिवराम आघाव (चेअरमन)
मा.श्री. सोमनाथ आबासाहेब तनपुरे (व्हा. चेअरमन)
मा.श्री. अजय भास्कर आघाव (व्यवस्थापक)
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद

मा.श्री. दिलीप शिवराम आघाव, चेअरमन, संत भगवान बाबा अर्बन क्रेडीट को.ऑप. सोसायटी

• सोनेतारण कर्ज • वाहन कर्ज • तारण कर्ज • मनी ट्रान्सफर सुविधा तात्काळ व विनम्र

मा.सौ.मनिषा दिलीप आघाव, संचालिका, संत भगवान बाबा अर्बन क्रेडीट सोसा. सदस्या, राहुरी खुर्द ग्रामपंचायत

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

- शुभेच्छूक -

मा.डॉ. अमीत पवार साहेब

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी
राहुरी तहसील कार्यालय, राहुरी

सर्व कर्मचारी वृंद महसूल विभाग, तहसील कार्यालय राहुरी

वंचित बहुजन आघाडी

मा.अॅड. प्रकाशजी आंबेडकर, राष्ट्रीय नेते — मा.श्री. राजेंद्र पातोडे, प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य — मा.सुजात आंबेडकर, युवा नेतृत्व

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

श्री.बाळासाहेब जाधव

तालुकाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, राहुरी तालुका
मा.सदस्य, टाकळीमिया ग्रामपंचायत

दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

अॅड.अशोक जगन्नाथ होले

बी.कॉम., एलएल.बी.
मो. ९८२२९५८१९७

ADVOCATE

अॅड.विशाल अशोक होले

बी.ए., एलएल.बी.
मो. ९५०३९२३२७५

ऑफीस : दुसरा मजला गुरूदत्त अपार्टमेंट, कोर्टाशेजारी, राहुरी, जि. अहिल्यानगर

जाहिरात संकलन : पत्रकार राजेंद्र परदेशी (दै.राष्ट्रसह्याद्री, राहुरी तालुका प्रतिनिधी) मोबा. ९२७२८३५७६९